
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १३०
www.ramprahar.com
मंगळवार, २६ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## संसदेच्या अधिवेशनात विरोधकांचा गदारोळ



**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या सोमवारी (दि. २५) पहिल्या दिवशी लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये जोरदार गदारोळ झाला. विरोधकांनी अदानी समूहाशी संबंधित कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांवर चर्चेची मागणी केली. पीठासीन अधिकाऱ्यांनी विरोधकांची मागणी फेटाळून लावली. त्यामुळे विरोधकांनी दोन्ही सभागृहात गदारोळ आणि जोरदार नारेबाजी केली. परिणामी दोन्ही सभागृहाचे कामकाज बुधवारपर्यंत तहकूब करावे लागले. आधी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केले. दुपारी १२ वाजता कामकाज सुरू होताच विरोधकांचा गदारोळ सुरूच होता. विरोधकांचा गदारोळ पाहून लोकसभा अध्यक्षांनी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब केले. आता कामकाज बुधवारीच सुरू होईल.

## अंतरंग

पनवेलमध्ये चालत्या कारला आग; सुदैवाने दोघे बचावले/२
माथेरानमध्ये पर्यटकांची ई-रिक्षाला पसंती/५
'आगामी निवडणुकाही एकजुटीने लढून जिंकू'/७

# मुख्यमंत्री कोण? लवकरच होणार निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडवत महायुतीने जोरदार मुसंडी मारली आहे. आता सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मंगळवारी (दि. २६) मुंबईत येण्याची शक्यता आहे. त्यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्रिपदाच्या नावाची घोषणा होणार असल्याचेदेखील म्हटले जात आहे.

राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या निकालात महायुतीने बाजी मारत २३० जागांवर विजय मिळवला.



यामध्ये भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५७ जागांवर बाजी मारली, तर राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागांवर विजय मिळवला.

दुसरीकडे महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघ्या ४७ जागा आल्या. यामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २०, काँग्रेसने १९, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाने १०, समाजवादी पक्षाने दोन, तर शेकाप आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (एम)ने प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला. निकालानंतर आता महायुतीकडून सत्तास्थापनेच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मंजुरी दिल्याची सूत्रांची माहिती आहे. ते सोमवारी (दि. २५) दिल्लीला रवाना झाले. याचबरोबर एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असतील अशीही चर्चा आहे. याबाबत अंतिम निर्णय बाकी आहे.

शिवसेनेला सुमारे १२ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता असून यामध्ये काही महत्त्वाच्या खात्यांचाही समावेश आहे. दुसरीकडे राष्ट्रवादीलाही जवळपास १० मंत्रिपदे मिळणार आहेत. १३२ आमदार असलेल्या भाजपच्या वाट्याला २१ मंत्रिपदे येण्याची शक्यता आहे. गृह, अर्थ, नागरी विकास आणि महसूल ही प्रमुख चार खाती भाजप आपल्याकडे ठेवण्यास उत्सुक आहे.

# रायगडात ५४ उमेदवारांची अनामत रक्कम झाली जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानसभेच्या नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत रायगड जिल्ह्यातील सात मतदारसंघातून निवडणूक लढवलेल्या ७३ उमेदवारांपैकी ५४ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

रायगड जिल्ह्यात २० नोव्हेंबरला मतदान झाले. यामध्ये सात मतदारसंघातून ७३ उमेदवार आपले राजकीय भवितव्य आजमावत होते. यात पनवेल १३, उरण १४, कर्जत नऊ, पेण सात, अलिबाग १४, श्रीवर्धन ११, महाड पाच उमेदवारांचा समावेश होता. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी झाली. ५४ उमेदवारांना अनामत रक्कम वाचविण्यासाठी आवश्यक असलेली मते न मिळाल्यामुळे त्यांची अनामत रक्क जप्त झाली आहे. यात अपक्षांबारोबरच राजकीय पक्षांच्या उमेदवारांचादेखील समावेश आहे.

जिल्ह्यात प्रशांत ठाकूर (पनवेल), महेंद्र थोरवे (कर्जत), रविशेठ पाटील (पेण), महेश बालदी (उरण), महेंद्र दळवी (अलिबाग), आदिती तटकरे (श्रीवर्धन), भरत गोगावले (महाड) हे उमेदवार विजयी झाले; तर बाळाराम पाटील, लीना गरड (पनवेल), सुधाकर घारे, नितीन सावंत (कर्जत), प्रीतम म्हात्रे, मनोहर भोईर (उरण), प्रसाद भोईर, अतुल म्हात्रे (पेण), चित्रलेखा पाटील, दिलीप भोईर (अलिबाग), अनिल नवगणे (श्रीवर्धन), स्नेहल जगताप (महाड) हे उमेदवार पराभूत झाले, परंतु त्यांनी अनामत रक्कम जप्त होण्यासाठी लागणाऱ्या किमान मतांपेक्षा जास्त मते मिळवली. त्यामुळे त्यांची अनामत रक्कम वाचली आहे.

जिल्ह्यात ५४ उमेदवारांची अनामत जप्त झालेली आहे. यामध्ये उरण व अलिबागमध्ये प्रत्येकी ११, पनवेल १०, श्रीवर्धन नऊ, कर्जत सहा, पेण चार आणि महाडमधील तीन उमेदवारांचा समवेश आहे.

रायगड जिल्ह्यात सातही मतदारसंघात विद्यमान आमदार निवडून आले आहेत. कोणत्याही मतदारसंघात बदल झालेला नाही. असे होण्याची ही पहिलीच वेळ आहे. प्रशांत ठाकूर (पनवेल), महेंद्र थोरवे (कर्जत), रविशेठ पाटील (पेण), महेश बालदी (उरण), महेंद्र दळवी (अलिबाग), आदिती तटकरे (श्रीवर्धन), भरत गोगावले (महाड) हे आमदार निवडणूक लढवत होते. सर्व विजयी झाले आहेत.

जिल्ह्यात झालेल्या मतदानापैकी १६ हजार ९०९ मतदारांनी नोटाचा पर्याय स्वीकारला. पनवेलमध्ये सर्वाधिक तीन हजार ९०५ मतदारांनी नोटासमोरील बटण दाबले. त्या खालोखाल श्रीवर्धनमधील तीन हजार ३७५ मतदारांनी नोटाला पसंती दिली आहे. याशिवाय उरणमध्ये २६५३, पेण २४७३, कर्जत १९५६, अलिबाग १६५८ आणि महाडमध्ये ८८९ जणांनी नोटा पर्याय स्वीकारला.

### असा आहे निकष

उमेदवाराला मतदारसंघात नोटा वगळता झालेल्या एकूण वैध मतांच्या एक-षष्ठांश (१/६)पेक्षा कमी मते मिळाली तर त्यांची अनामत रक्कम जप्त केली जाते. जर विधानसभेच्या मतदारसंघात नोटा वगळता एकूण वैध मतदान दोन लाख झाले असेल, तर त्या मतदारसंघात निवडणूक लढवत असलेल्या उमेदवारांना आपली अनामत रक्कम वाचवण्यासाठी ३३ हजार ३३३पेक्षा जास्त मते मिळणे आवश्यक आहे.

# कशेडी बोगदा वाहतुकीसाठी बंद



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी बोगदा सोमवार (दि. २५) पासून पुढील १५ दिवसांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. पुलाच्या गर्डर शिफ्टिंगचे काम सुरू असल्याने हा बोगदा वाहतुकीसाठी तात्पुरत्या स्वरूपात बंद असणार आहे. दरम्यान, मुंबईहून गोव्याकडे जाणारी आणि गोव्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक कशेडी घाटमार्गे वळविण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार कशेडी बोगद्याकडे जाणाऱ्या पुलाच्या गर्डर शिफ्टिंगचे काम सुरू आहे. हे काम करताना येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना धोका उद्‌भवू शकतो. त्यामुळे बोगद्यातून होणारी वाहतूक १५ दिवसांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती राष्ट्रीय महामार्गाचे अभियंता पंकज गोसावी यांनी दिली.

मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटाला पर्याय म्हणून कशेडी बोगद्याची निर्मिती केली आहे. त्यामुळे पोलादपूर ते खेड हे अंतर अवघ्या २० मिनिटांत पूर्ण करणे शक्य झाले आहे. सध्या घाटमार्गे प्रवास करावा लागल्याने प्रवासाचा वेळ वाढण्याची शक्यता आहे.

## कार नदीत कोसळून दोन जणांचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव तालुक्यातील वावे दिवाळी गावच्या हद्दीत सोमवारी (दि. २५) संध्याकाळी ५च्या सुमारास महाडकडून मुंबईकडे जात असलेली कार पुलाचा कठडा तोडून सुमारे २५ ते ३० फूट खोल नदीत कोसळली. या अपघातात एक महिला व पुरुष असे दोन जण जागीच ठार झाले आहेत.



या गाडीत (एमएच १६-बीएच ४८२९) एकूण तीन प्रवासी प्रवास करीत होते. त्यातील दोघांचा मृत्यू झाला असून चालक गंभीर जखमी झाला आहे. मृतांमध्ये देवयानी दशरथ दुदुमकर आणि दशरथ दुदुमकर (रा. अँटॉप हिल, मुंबई) यांचा समावेश आहे. जखमी कारचालकाला अधिक उपचारासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मानले मतदारांचे आभार

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरभरून मतदान केल्याबद्दल मतदारांचे आभार मानले आहेत. महाराष्ट्रातील लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडका शेतकरी, युवा, ज्येष्ठ नागरिक यांनी शिवसेनेवर मतांच्या माध्यमातून जो स्नेहाचा वर्षाव केला, जो विश्वास दाखवला तो आम्ही कधीही विसरणार नाही, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी मतदारांना लिहिलेल्या पत्रातून म्हटले आहे. याआधी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेसाठी पत्र लिहून आभार मानले होते.

### शिवसेना उबाठा गटनेतेपदी भास्कर जाधव यांची निवड

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नवनियुक्त आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाकडून तीन नेत्यांवर जबाबदारी देण्यात आली आहे. त्यानुसार विधीमंडळ गटनेतेपदी भास्कर जाधव यांची निवड करण्यात आली. प्रतोदपदी सुनील प्रभू यांची पुन्हा एकदा वर्णी लागली, तर विधीमंडळ नेतेपदी आदित्य ठाकरे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

# श्री रणछोड देवस्थान मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा

■ आमदार प्रशांत ठाकूर सपत्नीक सहभागी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील श्री रणछोड देवस्थान ट्रस्ट यांच्या श्री रणछोड देवस्थान (शनि मंदिर) या मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा सोमवारी (दि. २५) सकाळी विधीवतरित्या झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या पत्नी वर्षा ठाकूर, शिवसेना महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण सपत्नीक तसेच सुनील खळदे, चेतन देशमुख, यतीन देशमुख आदी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यांच्या हस्ते विविध धार्मिक विधी पार पाडण्यात आले.

या जीर्णोद्धार सोहळ्यास महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक राजू सोनी, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, उद्योजक अरविंद सावळेकर, पवन सोनी, उपमहानगरप्रमुख महेश सावंत, मंदार काणे, ॲड. अमर पटवर्धन, चारू पन्हाळे, बिपीन मुनोत, पत्रकार संजय कदम, वास्तूविशारद अभिनव पाटकर, महेश गायकवाड, केदार भगत, अमरिश मोकल यांच्यासह पनवेलकर व नेहमीच दर्शनाला येणारे भाविक उपस्थित होते.

# मुरूडमध्ये माकडांचा उपद्रव

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात माकडांनी उच्छाद मांडला आहे. माकडांच्या वाढलेल्या उपद्रवामुळे बागायतदार, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. आंबा, काजू बागांसह फळपिकांचे नुकसान करणाऱ्या माकडांना पकडण्याची मोहीम वनविभागाने हाती घेण्याची मागणी करण्यात येत आहे.

मुरूड परिसरातील बागायतदार व शेतकरी माकडांच्या त्रासाला कंटाळले आहेत. नारळाच्या झाडाला कोय फुटून छोटे नारळ बाहेर येताच माकडे ती खायला येतात. त्यामुळे नारळ मोठा होत नसल्याने नुकसान होत आहे. आगामी काळात आंब्याला मोहोर येणार आहे. त्यानंतर आंबा हा कैरी रूपात असताना माकडांनी त्याकडे मोर्चा वळवल्यास आंबा पीक नष्ट होऊ शकते.

### पिकांचे नुकसान, बागायतदार त्रस्त



जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आंबा, काजूबरोबर इतर फळांचे उत्पन्न घेतले जाते. भाजीपाला व भातशेतीही केली जाते, मात्र गेली काही वर्ष फळबागा आणि शेतपिकांचे माकडांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे कोकणातील शेतकरी आणि बागायतदार हवालदिल झाला आहे. दरवर्षी त्याला मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

> मुरूड परिसरात माकडांचा वावर वाढला आहे. त्यापासून बागांचे नुकसान होत असल्याचे समजते. शेतकऱ्यांनी असा त्रास होत असल्यास वनविभागाला कळवावे. तातडीने कर्मचाऱ्यांना पाठवण्याची सोय करण्यात येईल. शासन जंगलात फळझाडे लावण्याचाही प्रयत्न करीत आहे.
>
> **-मनोज वाघमारे,** वनक्षेत्रपाल

### शहरातही उच्छाद

मुरूड शहरात बाजारपेठेमध्ये रोज सकाळी सातच्या सुमारास छपरावर २०-२५ माकडे असतात. उड्या मारत, आवाज करत ते फिरतात. घराची खिडकी उघडी असली तर घरातील खाण्याच्या वस्तू उचलून पळून जातात. त्यामुळे घरातील महिला, लहान मुले भयभीत झाली आहेत. नागरिकांना दरवाजे बंद करून घरी बसावे लागत आहे.

> मुरूड, खारआंबोली, वाणदे, आगरदांडा परिसरात माकडे, डुकरांचा अतिशय त्रास आहे. ते उभे पीक आडवे करून जातात. त्यामुळे आर्थिक नुकसान सोसावे लागते. ते लक्षात घेता माकडे, डुकरांचा बंदोबस्त करण्यात यावा, जेणेकरून पिकाचे नुकसान होणार नाही.
>
> **-मनोज कमाने,** शेतकरी

# रायगड जिल्ह्यात पशुगणनेला सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात २१व्या पशुगणनेला सोमवार (दि.२५) पासून सुरुवात करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी निवासस्थानातील गायवर्गीय पशुंची गणना करीत या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.



पशुसंवर्धन विभागाकडून दर पाच वर्षांनी पशुगणना केली जाते. जनगणनेच्या धर्तीवरच ही मोहीम राबवली जाते. मागील पशुगणना २०१९मध्ये करण्यात आली होती. यंदाची पशुगणना २५ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली आहे. पशुगणना करण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन विभाग व जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. ही मोहीम २८ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार असून पशुंची गणना करण्यासाठी १२९ प्रगणक, २७ पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या मोहिमेत गायवर्ग, म्हैसवर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह यांच्यासह बदक, कुक्कुट या पक्षांची गणना केली जाणार आहे.

पशुगणनेमुळे जनावरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. त्यानुसार शासनाकडून धोरण, योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते, शिवाय पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात किती पशुधन आहे त्यानुसार लसीकरणासाठी औषधांचा पुरवठा केला जातो. त्यामुळे आपल्याकडील पशुंची खरी माहिती पशुपालकांनी द्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

पशुगणनेच्या शुभारंभावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम उपस्थित होते.

# बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये भारताची विजयी सलामी

## पर्थमध्ये ऑस्ट्रेलियावर मिळवला ऐतिहासिक विजय

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने बॉर्डर-गावसकर ट्रॉफीतील पहिल्याच कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा दारूण पराभव केला आहे. पर्थच्या अभेद्य बालेकिल्ल्यात भारताने ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी मोठा ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

यशस्वी जैस्वालच्या १६१ धावा आणि विराट कोहलीच्या शतकाच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियाला विजयसाठी ५३३ धावांचे लक्ष्य देत डाव घोषित केला होता. पहिल्या डावात १५० धावांवर सर्वबाद झाल्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी ऐतिहासिक पुनरागमनात मोठी भूमिका बजावली.

जसप्रीत बुमराहने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण भारताला पहिल्या डावात ऑस्ट्रेलियाच्या भेदक गोलंदाजीसमोर फार धावा करता आल्या नाहीत आणि टीम इंडिया १५० धावा करत सर्वबाद झाली. यानंतर भारताच्या गोलंदाजांनी कांगारू संघाच्या फलंदाजांना फार काळ मैदानावर टिकू दिले नाही.




भारतीय संघ पहिल्या डावातील ४६ धावांच्या आघाडीसह फलंदाजी करण्यासाठी उतरला. केएल राहुल आणि यशस्वी जैस्वालने २०१ धावांची ऑस्ट्रेलियामध्ये भारताकडून सर्वात मोठी भागीदारी रचत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. यशस्वीने पहिल्याच ऑस्ट्रेलिया कसोटीत शतक झळकावत इतिहास घडवला. त्याने १६१ धावांची, तर राहुल ७७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यानंतर ऑस्ट्रेलियासाठी कायमच कर्दनकाळ ठरलेल्या विराट कोहलीने आपल्या पुनरागमनाचा डंका वाजवत १४३ चेंडूंत वादळी शतक झळकावले.

विराटच्या शतकासह भारताने दुसऱ्या डावात ६ बाद ४८७ धावा केल्या. यासह भारताने ५३३ धावांची आघाडी घेत डाव घोषित केला. यानंतर भारताने तिसऱ्या दिवशीच ऑस्ट्रेलियाला फलंदाजीसाठी बोलावले आणि तीन विकेट्स चटकावल्या. चौथ्या दिवशी भारताने तिसऱ्या सत्रापर्यंत ऑस्ट्रेलियाला ऑल आऊट करत ऐतिहासिक विजयाची पर्थ स्टेडियमवर नोंद केली. दुसऱ्या डावात भारताकडून जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी तीन, वॉशिंग्टन सुंदरने दोन, तर हर्षित राणा आणि नितीश रेड्डीने एक विकेट घेत भारताच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजवली. भारत हा पर्थच्या स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाला पराभूत करणारा पहिला संघ ठरला आहे.

## निवडक

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, वर्ण सावळा, डोक्याचे केस काळे वाढलेले, दाढी मिशी वाढलेली, चेहरा उभट, अंगाने मध्यम असून अंगात निळा फुल बाह्याचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट व डोक्याला रूमाल बांधलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो.नि.स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलीला ढकलले देहविक्रीत

**नवी मुंबई :** अल्पवयीन मुलीकडून वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या स्पा चालक व त्याच्या साथीदारांवर नेरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून मुंबई पोलिसांनी एका कारवाईत या अल्पवयीन मुलीची सुटका केली आहे. तिच्या चौकशीत नेरूळमध्ये तिचे लैंगिक शोषण झाल्याची माहिती समोर येताच नेरूळ पोलीस ठाण्यातदेखील गुन्हा दाखल झाला आहे. मुंबई पोलिसांनी एका कारवाई १४ वर्षीय मुलीची सुटका केली आहे. तिच्याकडून देहविक्री करून घेतली जात असल्याने संबंधितांवर कारवाई झाली आहे. दरम्यान, पीडित मुलीकडे पोलिसांनी केलेल्या चौकशीत नेरूळ सेक्टर २० येथील ग्लॅम्स या स्पामध्येदेखील तिच्याकडून देहविक्री करून घेतल्याची माहिती समोर आली. याबाबत मुंबईत गुन्हा दाखल करून नेरूळ पोलिसांकडे चौकशीसाठी वर्ग केला आहे.

### भारतीय संविधान दिनी प्रबोधन

**नवी मुंबई :** नेरूळ जयंती उत्सव समितीच्या विद्यमाने नेरूळ सेक्टर १८ येथील विद्या भवन हायस्कूलमध्ये मंगळवारी (दि.२६) सायंकाळी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात येणार आहे. या वेळी सायंकाळी साडेसहा वाजता महिलांचा भीम बुद्ध गीतांचा कार्यक्रम होणार असून त्यानंतर सीईओ व आंबेडकराईट एज्युकेटेड ग्रुप प्रमुख भूषण रामटेके, प्रा.आनंद देवडेकर हे भारतीय संविधानावर प्रबोधनात्मक मार्गदर्शन करणार आहेत. या वेळी प्रमुख वक्त्याच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

### रबाळेत लाखोंची घरफोडी

**नवी मुंबई :** मैत्रिणीच्या लग्नाच्या वाढदिवसाच्या पार्टीसाठी गेलेल्या महिलेच्या घरी घरफोडीची घटना घडली. यामध्ये त्यांचे एक लाखाचे दागिने चोरीला गेले आहेत. याप्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. घणसोली गाव परिसरात राहणाऱ्या महिलेच्या घरी हा प्रकार घडला. त्यांच्या मैत्रिणीच्या लग्नाचा वाढदिवस असल्याने शुक्रवारी त्या मैत्रिणींसह अंबरनाथला गेल्या होत्या. रात्री परत येण्यास उशीर झाल्याने त्या ठाणेला मैत्रिणीकडे राहिल्या होत्या. शनिवारी सकाळी त्या परत घरी आल्या असता त्यांचा दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसून आले. यामुळे त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता, दागिने व रोकड असा एक लाखाचा ऐवज चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले.

# 'जनतेने नाकारलेल्या लोकांकडून सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि.२५) माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, संसदेचे चार आठवड्यांचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. विरोधी पक्षांवर ताशेरे ओढत पंतप्रधान मोदी म्हणाले की, निवडणुकीच्या काळात जनतेने नाकारलेले लोक सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करतात.



सलग ८०-९० वेळा जनतेने नाकारलेले लोक संसदेत चर्चा होऊ देत नाहीत. त्यांना जनतेच्या आकांक्षा कळत नाहीत. मला आशा आहे की, संसदेच्या हिवाळी अधिवेशनात प्रत्येक पक्षातील नवीन सदस्यांना त्यांचे विचार मांडण्याची संधी मिळेल. जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे आणि संसदेचा वेळ अशा प्रकारे वापरला गेला पाहिजे की त्यामुळे जागतिक स्तरावर भारताला मिळालेला आदर बळकट होईल, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या 'फलदायी हिवाळी अधिवेशनाची' अपेक्षा व्यक्त केली. हे अधिवेशन आगामी पिढ्यांना प्रेरणा देणारे असायला हवे, असे ते म्हणाले. भारताचे मतदार लोकशाहीला समर्पित आहेत, संविधानाप्रती त्यांचे समर्पण आहे, संसदीय कार्यपद्धतीवर त्यांचा विश्वास आहे, संसदेत बसलेल्या आपल्या सर्वांना जनतेच्या भावनांनुसार जगावे लागेल आणि हीच गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, प्रत्येक विषयाचे विविध पैलू आपण सभागृहात अतिशय योग्य पद्धतीने अधोरेखित केले पाहिजेत, येणाऱ्या पिढ्यांनाही त्यातून प्रेरणा मिळेल. संविधान दिनाच्या ७५ व्या वर्धापन दिनाचा अभिमान वाढवण्यासाठी, जगात भारताच्या प्रतिष्ठेला बळ देण्यासाठी, नवीन खासदारांना संधी देण्यासाठी आणि नवीन विचारांचे स्वागत करण्याचे आवाहन सर्व खासदारांनी पंतप्रधान मोदी यांनी केले.

## पनवेलमध्ये चालत्या गाडीला आग

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे बाजूकडून अलिबागकडे जाणाऱ्या एका



गाडीने पनवेलजवळील तक्का येथील उड्डाणपुलावर अचानकपणे पेट घेवून काही क्षणातच ही गाडी आगीच्या भस्मसात झाली. सुदैवाने गाडीतील दोघेही बचावले आहेत.

कामोठे येथून अलिबाग येथील आपल्या घरी राणे व त्यांचे सहकारी हे आज सायंकाळी जात असताना अचानकपणे तक्का येथील उड्डाण पुलावर गाडीमध्ये शॉर्टसर्कीट झाल्याने त्यांनी गाडी बाजूला घेतली व ते गाडी बाहेर येवून आग विझविण्याचा प्रयत्न करीत असताना गाडीने अचानकपणे पेट घेतला व काही वेळातच ही गाडी आगीत भस्मसात झाली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## आमदार गोगावलेंकडून वृत्तपत्र विक्रेत्यांना सायकलीचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

महाड पोलादपूर माणगावचे आमदार भरत गोगावले यांच्यामार्फत राकेश वाघ, संजय पवार, दिलीप जोशी, विठोबा दरेकर या चार वृत्तपत्र विक्रेत्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.



महाड विधानसभा मतदार संघातून आपला भरघोस मताधिक्याने विजय होऊन आपण आमदारकीचा चौकार मारला आहे. या निवडणुक काळात आपल्या प्रचार सभा, गाव दौरे, कॉर्नर सभा, रॅली यांना वृतपत्रातून दिलेली प्रसिद्धी ही सर्व वृत्तपत्र घरोघरी पोचवण्याचे काम या वृत्तपत्र विक्रेत्यांनी केली. त्यामुळे आपण केलेली विकास कामे, महायुतीने राबवलेल्या लोकोपयोगी कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोचण्यास मदत झाली आणि मतदानाची टक्केवारी वाढून त्याचा फायदा महायुतीला झाला. याचीच जाण ठेवून महाड बिरवाडी येथे घरोघरी वृत्तपत्रांचे वाटप करणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांना आपल्या माध्यमातून सायकलींचे वाटप करून हे काम करीत असताना त्यांना होणारा त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला असल्याचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी सांगितले.

या वेळी वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे पदाधिकारी प्रमोद पवार, परवेज मोमीन, संदीप पानावकर संतोष गुडेकर हे उपस्थित होते. याबाबत पुढे बोलताना आमदार गोगावले यांनी आपल्या सुरुवातीच्या कठीण काळात आपण पेपरची लाईन टाकण्याचे काम मुंबईत केले आहे. त्यामुळे या कामासाठी सकाळी लवकर उठून किती मेहनत घ्यावी लागते याची जाण आहे. आपण कितीही मोठे झालो तरी आपले जुने दिवस कदापि विसरणार नसून त्याच भावनेतून आपले एकेकाळचे सहकारी असणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांना आपण सायकलींचे वाटप केले असल्याचे गोगावले यांनी सांगितले.

वृत्तपत्र संघटनेच्या वतीने परवेझ मोमीन, राकेश वाघ, प्रमोद पवार यांनी आमदार गोगावले यांचे आभार मानले आहे.

## मुंबई-लातूर, मुंबई-बीदर एक्स्प्रेस गाड्यांचा कायमस्वरूपी विस्तार

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी ट्रेन क्रमांक २२१०७/२२१०८ आणि २२१४३/२२१४४ यामध्ये कायमस्वरूपी तीन अतिरिक्त डब्यांसह चालवण्याचा निर्णय घेतला आहे या गाडीला दोन अतिरिक्त तृतीय वातानुकूलित कोच आणि एक अतिरिक्त द्वितीय वातानुकूलित कोच जोडण्यात येणार आहे.

ट्रेन क्रमांक २२१०७/२२१०८ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - लातूर एक्सप्रेस छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून ०१.१२.२०२४ पासून आणि लातूर येथून दि. ०२.१२.२०२४ पासून सुरू होणार आहे.

ट्रेन क्रमांक २२१४३/२२१४४ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - बीदर एक्सप्रेस ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून दि. ४.१२.२०२४ पासून आणि बीदर येथून दि. ५.१२.२०२४ पासून सुटणार आहे.

ट्रेन क्रमांक २२१०७/२२१०८ आणि २२१४३/२२१४४ साठी सुधारित संरचनेमध्ये एक प्रथम वातानुकूलित, दोन द्वितीय वातानुकूलित, चार तृतीय वातानुकूलित, आठ शयनयान, दोन लगेज कम गार्ड ब्रेक व्हॅनसह चार सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे (एकूण २१ डबे) आहेत.




**चौक : नवीन डिझायर गाडीचे लॉन्चिंग खालापूर तालुक्यातील सिमरन मोटर्स येथे पत्रकार अर्जुन कदम व कंपनी वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत झाले.**

## कोर्लई येथील रस्ता डागडुजीची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील कोर्लाई येथील बस थब्याचा अगदी समोर असणारा शांती भगिनी आश्रम रस्ता हा दीड किलोमीटरचा रस्ता गेले कित्येक वर्ष बनवण्यात न आल्याने अनेक ग्रामस्थ यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेले कित्येक वर्ष रस्ता खड्डेमय ठेवल्याने अनेक प्रवासी व अनेक ग्रामस्थ यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. संपूर्ण रस्त्यामधील दगडे निघून गेली आहेत. या रस्त्याची डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.



जागोजागी खड्डे पडले असून सुधा कोणताही लोकप्रतिनिधी या रस्त्याकडे पहात नसल्याने लोकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शांती भगिनी आश्रम कडे हा रस्ता जात असून येथे राहणाऱ्या मुली तसेच सिस्टर, आदिवासी वाडी, ख्रिचन समाजाची स्मशानभूमी आदी लोकांना याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येत असल्याचे ग्रामस्थ यांनी सांगितले आहे, परंतु जिल्हा परिषद लक्ष देत नसल्याने रस्त्याचे काम रखडले आहे, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

याबाबत माजी सैनिक झाक्री वेगस व वित्रिण वेगस यांनी सांगितले की, सदरचा रस्ता रखडल्यामुळे हाच रस्ता स्मशान भूमीकडे जात असल्याने लोकांना खड्यामधून जावे लागत आहे.गेले अनेक वर्ष हा रस्ता केला गेला नाही. त्यामुळे येथे राहणाऱ्या लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ज्यांच्या आखत्यारीत हा रस्ता आहे त्यांनी तातडीने रस्ता बनवावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली आहे.

## आमदार आदिती तटकरेंच्या विजयात अनिकेत तटकरेंचे महत्त्वपूर्ण योगदान

**रोहा : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघामध्ये आदिती तटकरे यांनी सलग दुसऱ्यांदा विजय प्राप्त करीत एक लाख १६ हजार ५० मते घेऊन ८२७९८ एवढ्या भरघोस मतांनी विजय संपादन केला. या विजयाने श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात आदिती तटकरे यानी दुसऱ्यांदा आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करीत रेकॉर्ड ब्रेक विजय मिळविला.



श्रीवर्धन मतदार संघाचे नेतृत्व खासदार सुनील तटकरे यांनी स्वीकारल्यानंतर खऱ्या अर्थाने श्रीवर्धन मतदारसंघाच्या विकासाला सुरुवात झाली. रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सोयी सुविधांबरोबरच अनेक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. कोट्यवधींचा रुपयांचा निधी उपलब्ध करून देत श्रीवर्धनचा चेहरा मोहराच बदलला याचाच परिणाम म्हणून मतदारांनी आदिती तटकरेंना भरघोस मतदान केले आणी आदिती तटकरे यांनी ८२ हजार ७९८ मतांनी रेकॉर्ड ब्रेक विजय मिळविला.

आदिती तटकरे यांच्या निर्विवाद विजयामध्ये विशेष मेहनत माजी आमदार अनिकेत तटकरे यांची पहायला मिळाली. अनिकेत तटकरे यांनी युवकांची फळी निर्माण करीत जेष्ठांचा योग्य तो सन्मान राखत निवडणुकीची प्रक्रिया योग्य व नियोजन पद्धतीने राबविली. अनेक वर्षापासून तळा, म्हसळा, श्रीवर्धन तालुक्यातील मुंबई मंडळाची संघटना उभी करीत योग्य नियोजन पद्धतीने काम करीत जास्तीत जास्त मतदार अनिकेत तटकरे यांनी उभे केले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे श्रीवर्धन मतदार संघातील बहिणीनी आदिती तटकरे यांना उत्स्फूर्त मतदान केले, मात्र लाडक्या भावाने या संपूर्ण निवडणुकीत योग्य ते नियोजन करीत अदिती तटकरे यांना भरघोस मताधिक्य मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणी श्रीवर्धन हा राष्ट्रवादीचाच बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले.

## ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वर्धापन दिन सोहळा



**उरण : वार्ताहर**

ज्येष्ठ नागरिक मंडळ मुळेखंड, तेलीपाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा व परिसर ज्येष्ठ नागरिक मंडळ यांचा चतुर्थ वर्धापन दिन सोहळा गुरुवार (दि. २१) मोठ्या उत्साहात झाला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे यांनी भूषविले होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे समाजसेविका अनिता घरत, उरण सामाजिक संस्थेचे संतोष पवार, मधुसदन म्हात्रे, प्रा. टेमकर, होळकर गुरुजी, उमेश नाईक, करंजा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश थळे, कार्याध्यक्ष राजेंद्र घरत, चाणजे ग्रामपंचायत ग्रामसेवक चव्हाण आदी उपस्थित होते. या दिवशी श्री सत्यनारायणाची महापूजा व विविध सांस्कृतिक विरंगुळा केंद्र मुलेखंड फाटा, उरण येथे आयोजित करण्यात आले होते.

या सोहळ्यात तीर्थ प्रसाद, ज्येष्ठ नागरिक मंडळ- महिलांचा हळदी -कुंकू समारंभ, महाप्रसाद, मान्यवर, गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार, क्रीडा, कला, शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्यांचा सन्मानचिन्ह, देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक मंडळाचे कार्याध्यक्ष अनंत पाटील, अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, उपाध्यक्ष अंकुश म्हात्रे, सचिव परशुराम पाटील, सहसचिव सुभाष गुरव, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सहखजिनदार गोपीनाथ मांडेलकर व कमिटी सदस्य सदस्या यांचे सहकार्य मोलाचे सहकार्य मिळाले.

## इनरव्हील क्लब ऑफ नवी मुंबई सनराईजचा कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

इनर व्हील क्लब ऑफ नवी मुंबई सनराईज तर्फे खारघर मधील सेंट्रल पार्क मध्ये नुकताच आयोजित शालेय विद्यार्थी, पालक तसेच आजी-आजोबा यांचा 'आओ रंग भरें' कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात दीडशेपेक्षा अधिक नागरिक सहभागी झाले होते.

'इनर व्हील क्लब ऑफ नवी मुंबई सनराईज' एक आंतरराष्ट्रीय महिला संघटन असून गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबिवत आहे. शालेय विद्यार्थी, पालक तसेच आजी-आजोबा यांना एकाच वेळी विविध खेळ खेळून जीवनाचा आनंद घेता यावा यासाठी सेंट्रल पार्कमधील अम्पिथियेटरमध्ये 'आओ रंग भरें' या उपक्रमाच्या माध्यमातून चित्रकला स्पर्धा, आकाशात



फुगे उडविणे, योग, झुंबा आदी विविध स्पर्धा 'इनर व्हील क्लब ऑफ नवी मुंबई सनराईज'च्या अध्यक्षा रचना त्रिवेदी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. विशेष म्हणजे या उपक्रमात खारघर मधील रायगड जिल्हा परिषद तसेच खाजगी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक, आजी-आजोबा तसेच तरुण मुले-मुलीही सहभागी झाले होते.

या वेळी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धेकांना स्थानिक संगीतकारांकडून आयोजित करण्यात आलेल्या गीत, गायन संगीताचा आनंद घेता आला. विशेष म्हणजे चित्रकला स्पर्धेत लहान-मोठ्यांपासून सर्वांनी सहभाग घेतला. या वेळी डॉ. बादल यांनी विद्यार्थ्यांना मोबाइल व्यसनावर माहिती दिली. तर चित्रकला स्पर्धेत चित्रकार अभिजित चौबल, आदिश्वर जैन आणि उजला दराडे आदि मान्यवरांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या कार्यक्रमात 'इनर व्हील असोसिएशन'च्या अध्यक्षा वसुधा चंद्रचूड यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस आणि सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

दरम्यान, वुटुंबातील आजी-आजोबा, पालक आणि मुले-मुली एकत्र यावे, त्यांच्यात कौटुंबिक जिव्हाळा निर्माण व्हावा, या उद्देशाने 'आओ रंग भरें' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, असे 'इनर व्हील क्लब ऑफ नवी मुंबई सनराईज'च्या अध्यक्षा रचना त्रिवेदी यांनी सांगितले.

## रेवदंड्यात काळभैरव उत्सव; मंदिराला रोषणाई

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडयातील भाविकांचे श्रध्दास्थान व भक्तीस्थान असलेल्या श्री काळभैरवाचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.रेवदंडा गोळा स्टॉप नजीक हरेश्वर मंदिराशेजारी असलेले श्री काळभैरव मंदिर जागृत देवस्थान म्हणून प्रसिध्दीस आहे.



सालाबाद प्रमाणे रेवदंडा गोळा स्टॉप हरेश्वर मंदिर येथे श्री काळभैरव उत्सव शनिवारी झाला. रेवदंडा श्री काळभैरव मित्रमंडळ वारेवदंडा योगेश्वरी महिला मंडळ यांचे विद्यमाने हा उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवास रेवदंडा व परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी करून श्री काळभैरव दर्शनाचा लाभ घेवून महाप्रसादाचा लाभ घेतला तसेच या वेळी रांगोळी प्रदर्शन व रात्री मनोरंजनार्थ मैफिल सप्तसुरांची या संगित रजनीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री काळभैरव उत्सवाचे निमित्ताने मंदिरा सभोवताली आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती तसेच या निमित्ताने बनविण्यात आलेला मातीचा किल्ला पहाण्यास सर्वाचे आकर्षण ठरले. हा उत्सव यशस्वीपणे होण्यासाठी काळभैरव मित्रमंडळ अध्यक्ष वैभव चुनेकर, उपाध्यक्ष भगवान तांबडकर, सेक्रेटरी किरण चुनेकर, सहसेकेटरी वैभव नाईक, खजिनदार सुरेंद्र गोंधळी, सदस्य अंजनीकुमार तांबडकर, सदस्य राजेश चुनेकर, सदस्य अमित नाईक, सदस्य मिलिंद चुनेकर, सल्लागार शरद गोंधळी, सल्लागार तुकाराम चुनेकर, सल्लागार यशवंत, पिटनाईक आदीसह योगेश्वरी महिला मंडळ तसेच युवा व युवती वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.

## निवडक

### लाखोंच्या वस्तूंची चोरी

**पनवेल :** लाखो रुपये किंमतीच्या वस्तूंची चोरी केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल एटले यांचे सोन्याची चेन व कानातील बाली तसेच दोन मोबाईल फोन त्यांच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने आरोपी रामरुप राजपूत (वय २०) याने चोरी करून नेल्याने त्याच्या विरोधात एक लाख २० हजार रुपये किंमतीच्या मुद्देमालाची चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** गळफास घेतलेल्या अवस्थेत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. पनवेल परिसरात या व्यक्तीचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. मयत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, रंग सावळा, उंची पाच फुट पाच इंच, डोक्याचे केस काळे वाढलेले, दाढी वाढलेली, चेहरा उभट, अंगाने मध्यम असून, अंगात आकाशी टी-शर्ट व काळी जिन्स पॅन्ट तसेच पायाच्या पंज्याजवळ त्वचारोगाने झालेल्या जखमा आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पो.राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अपघातांचे प्रमाण वाढले

## कारवरील ताबा सुटल्याने दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

कारवरील ताबा सुटल्याने कारचालकाने पुढे जाणाऱ्या पिकअपला पाठीमागून ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात दोन जण जखमी झाले आहेत. या अपघातात वाहनाचे नुकसान झाले आहे. रविवारी सकाळी १०:४०च्या सुमारास मुंबई-पुणे एक्सप्रेस वे मुंबई लेनवर किमी २.६०० येथे खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत हा अपघात झाला आहे.

टेम्पो पिकअप (एमएच ४६ बीएम ६९९८) यावरील चालक मच्छिंद्र नामदेव जाधव (वय ६५, रा.सेक्टर १४, कळंबोली) हे कळंबोली ते पनवेल असे जात असताना पुणे लेन किमी २/६०० या ठिकाणी तिसरे लेनवरून पहिल्या लेनला घेऊन जात असताना मागून येत असणारी स्विफ्ट कार (एमएच ०३ डिव्ही ०८१४) यावरील चालक बालाजी आंधळे (वय ३०, रा.लोणी, जि.पुणे) यावरील चालक याचा कारवरून ताबा सुटल्याने पुढील पिकअपला पाठीमागून



धडक मारली आणि जोरात अपघात झाला.

यात दोघे जखमी झाले. या ठिकाणी वाहतूक पोलीस व पळस्पे मोबाईल कर्मचारी व आयआरबीचे कर्मचारी हजर होते. कार अपघातातील जखमी शुभम सिंग व अंकिता सिंग यांना डोक्याला व मानेला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे पाठवण्यात आले.

## कारची मोटरसायकलला धडक; एक जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील गव्हाण फाटा उलवे ते जासई जाणाऱ्या ब्रीजवर एका मोटार सायकलला पाठीमागून येणाऱ्या कारने धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वार खाली पडून जखमी झाल्याची घटना घडली आहे.

सुंदर मोकल (वय ३३) हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकल घेवून कंपनीच्या कामानिमित्त उलवेवरून जासई येथे जात असताना गव्हाण फाट्याजवळ उलवे ते जासई जाणार्या ब्रीजवर आला असताना त्याच्या पाठीमागून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या गाडीने त्याच्या मोटरसायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात तो खाली पडून जखमी झाला आहे.

या घटनेनंतर वाहनचालकाने गाडी न थांबविता तो वेगाने पुढे पळून गेल्याने याबाबतची तक्रार उलवे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

## नौदलातील जवानाचा रेल्वे अपघातात मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय नौदलात कार्यरत असलेले जवान सेवानिवृत्तीचे आवश्यक कागदपत्रे जमा करण्यासाठी मुंबईत आले असता पनवेल येथे रेल्वेत अपघातात त्यांचा मृत्यू झाला. लोहमार्ग पोलीस आणि नौदलातील जवानांनी त्यांचे पार्थिव कायदेशीर सोपस्कार करून सन्मानपूर्वक त्यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केले. संतोष कुमार असे त्यांचे नाव असून दमन तटरक्षक दलात ते कार्यरत होते.

संतोष कुमार हे २०२५ ला भारतीय नौदलातून सेवानिवृत्त होणार असल्याने कागदपत्रे पूर्ण करण्यासाठी पनवेलला आले होते. मंगलोर उदना एक्सप्रेस या गाडीच्या डब्यात चढत असताना तोल जाऊन ते गाडीच्या चाका खाली आल्याने डोक्याला जबर मार लागून त्यात ते जखमी



झाल्याने त्यांना हवालदार इंगवले यांनी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले. घटनेची माहिती पोलिसांनी नौदल आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिल्यानंतर संतोष कुमार यांची मुलगी आणि कुटुंबीय पार्थिव घेण्यासाठी दाखल झाले असता नौदलातील जवानांनी सन्मानपूर्वक मानवंदना देत त्यांचे पार्थिव कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.

## नील हॉस्पिटलमध्ये गर्भाशय कर्करोग जनजागृती शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नील हॉस्पिटल पनवेल तर्फे नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील महिला शिक्षिकांसाठी शनिवारी गर्भाशयाचा कर्करोग जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात विद्यालयातील महिला शिक्षिकांची नियमित गर्भाशय तपासणी करण्यात आली. नील हॉस्पिटलच्या तज्ञ डॉ. सुलभा निल यांनी या शिबिरात विविध प्रकारच्या कर्करोगांविषयी महिला शिक्षिकांना मार्गदर्शन केले. गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी माहिती, त्याचे विविध प्रकार, त्याची लक्षणे तसेच त्याचे संभाव्य धोके याविषयी त्यांनी विस्तृतपणे



माहिती दिली. या आजारावर मात करण्यासाठी एचपीव्ही लस आणि तिचे फायदे याविषयीही त्यांनी माहिती दिली. गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करायचे असेल तर महिलांनी आपली जीवनशैली कशी निरोगी ठेवली पाहिजे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिरात हॉस्पिटल मधील वैद्यकीय तज्ञांच्या मार्फत महिला शिक्षिकांची मोफत एचपी ही स्क्रीनिंग टेस्ट घेण्यात आली. या टेस्टच्या माध्यमातून या आजाराचे लवकर निदान होते व त्यामुळे आजार लवकरात लवकर बरा होण्यास मदत होते. विद्यालयातील महिला शिक्षिकांसाठी हे गर्भाशय कर्करोग जनजागृती शिबिर अतिशय उपयुक्त होते. विद्यालयातर्फे डॉक्टरांच्या सर्व टीमचे आभार मानण्यात आले.

## सापडलेली सोन्याची चेन पोलीस ठाण्यात जमा

**पनवेल : वार्ताहर**

रस्त्यामध्ये चालताना मिळालेली जवळपास ७ ग्रॅम वजनाची चेन प्रामाणिकपणे दोन व्यक्तींनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात येवून जमा केल्याने या दोघांचे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने कौतुक करण्यात आले.

अंकुश इंगळे व संतोष कोळेकर हे दोघे करंजाडे परिसरातून पायी जात असताना त्यांना रस्त्यात जवळपास ७ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन पडलेली दिसली. तात्काळ त्यांनी ती ताब्यात घेवून चौकशी केली असता या चेनचा कोणीही मालक मिळून न आल्याने त्यांनी त्वरित पोलीस ठाण्यात येवून ही चेन वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे व इतर अधिकारी वर्गाच्या उपस्थितीत ताब्यात दिली. या प्रामाणिकपणाचे नितीन ठाकरे यांनी कौतुक केले.









**पनवेल :** आमदार महेश बालदी पुन्हा एकदा उरण मतदारसंघाच्या आमदारपदी निवडून आल्याबद्दल आपटा येथे माजी सरपंच अरुण पारठे, बुथ अध्यक्ष शहाजी पाटील, वावर्ले पंचायत समिती विभाग अध्यक्ष प्रदोष भद्रीके, ज्येष्ठ कार्यकर्ते मनोहर कडू, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, तालुका उपाध्यक्ष तनुजा टेंबे, अॅड. संजय टेंबे, माजी पं.स.सदस्य दत्ता पाटील, माजी सरपंच ज्ञानेश्वर भोईर, माजी उपसरपंच मयूर शेलार, रवींद्र टेंबे, शैलेश बर्वे, दीपक काकडे, नितीन काकडे, अमित आपटे, रघुनाथ जाधव, सचिन वाडेकर आदी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.

# सीकेटी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यमात विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी झालेल्या विज्ञान प्रदर्शनात ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी अनेक कल्पक वैज्ञानिक प्रकल्प सादर केले.

या विज्ञान प्रदर्शनासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन सुधीर ठाकूर उपध्याक्ष शिक्षक पालक संघ, श्रावणी वारेकर सहसचिव शिक्षक पालक संघ यांची उपस्थिती लाभली.

सृष्टी सुरेश नक्ती (इयत्ता सहावी), कैवल्य भारतभूषण पाटील (इयत्ता सातवी), प्रणव पी. मेस्त्री, सांकवी राजू वैदू (इयत्ता आठवी), वेदिका नितीन भुयार (इयत्ता नववी), आर्या संतोष सुर्यवंशी यांचे प्रकल्प वैशिष्ट पूर्ण ठरले.



या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळतो. तसेच भविष्यातील वैज्ञानिक घडविण्यासाठी अशा शालेय उपक्रमांचा निश्चित फायदा होतो. विज्ञान प्रदर्शनातील सहभागाबद्दल मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांची प्रशंसा केली.

या वेळी निरजा अदुरी (पर्यवेक्षिका इंग्रजी माध्यमिक), वैशाली पारधी (पर्यवेक्षिका इंग्रजी पूर्व प्राथमिक), तसेच सर्व विज्ञान शिक्षक उपस्थित होते. सर्व प्रकल्पांचे परिक्षण ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक गायकवाड आणि तृप्ती जोशी यांनी केले. या प्रदर्शनात एकूण ९३ प्रकल्प सादर करण्यात आले.

दरम्यान, सीकेटी विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

## उरणमध्ये मोफत नेत्रचिकित्सा शिबिर

**उरण : वार्ताहर**

वनवासी कल्याणआश्रम उरण आणि डॉ. हळदीपूरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने नुकतेच मोफत नेत्र चिकित्सा शिबिर आणि इंडियन फार्मासिटिकल असोसिएशन यांच्या वतीने आरोग्य मार्गदर्शन आणि मोफत हिमोग्लोबिन, रक्त शर्करा तपासणी, औषधे वाटप, शिबिर जांभूळपाडा मराठी शाळा तालुका उरण येथे आयोजित करण्यात आले होते.

जांभूळपाडा वाडीतील, गावातील तसेच आजूबाजूच्या गावातील १२० गुणांचे डोळे तपासण्यात आले. त्यामध्ये २२ जणांना मोतीबिंदू आढळला



त्यातील १६ रूणांना त्याच दिवशी पनवेल येथे लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट येथे शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आले. इंडियन फार्मासुटिकल असो. चे वतीने रुग्णांचा रक्त दाब आणि रक्त शर्करा तपासण्यात आली. ज्या रुग्णांना हिमोग्लोबिन कमी आहे त्या सगळ्यांना मोफत हिमोग्लोबिन वाढण्यासाठी औषधे देण्यात आली.

जांभूळपाडा येथील सुनील नाईक यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यात मोलाचे सहकार्य केले. वनवासी कल्याण आश्रम उरणचे अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी लक्ष्मी आज चॅरिटेबल ट्रस्ट तसेच इंडियन फार्मासिटिकल असोसिएशनचे आभार मानले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे आवर्त सारणीवर पेटेंट प्रसिद्ध

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाचे १९७०च्या पेटेंट कायद्यानुसार आवर्त सारणीवर पेटेंट कार्यालयाच्या शासकीय मासिकामध्ये १८ नोव्हेंबर रोजी पेटेंट प्रसिद्ध झाले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. डॉ. दीपिका हसीजा व प्रा. रूपाली नागरेकर या सर्वांनी १८ ऑक्टोबर रोजी पेटेंट प्रसिद्ध करण्यासाठी कार्यालाकडे अर्ज केला होता. कार्यालयाने त्यांच्या अर्जाची छाननी करून १८ नोव्हेंबर रोजी कार्यालयाच्या मासिकामध्ये आवर्त सारणीवर पेटेंट प्रसिद्ध केले. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मूलद्रव्याच्या गुणधर्मानुसार त्यांची मांडणी करताना आवर्त सारणीचा वापर करता येईल.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे कार्यकारी संचालक परेश ठाकूर, सचिव सिद्धेश्वर गडदे या सर्वांनी आवर्त सारणीवर पेटेंट प्रसिद्ध झाल्याबद्दल अभिनंदन केले.













**पनवेल :** मतदारसंघातून चौथ्यांदा विजयी होण्याचा मान आमदार प्रशांत ठाकूर यांनी पटकावला आहे. त्याबद्दल मार्गदर्शक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अनेकांनी अभिनंदन केले. दरम्यान, या विजयामध्ये मोलाचे योगदान देणारे भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचेही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.

संपादकीय

## फडणवीसच मुख्यमंत्री ?

विधानसभा निवडणुकीत दोनतृतियांश यश मिळाल्यानंतर महायुतीमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण असून मुख्यमंत्री कोण होणार याचीच प्रतीक्षा साऱ्यांना लागून राहिली आहे. देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री झाले पाहिजेत हा भाजप नेत्यांचा, आमदारांचा आणि कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. या संदर्भातील निर्णय भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांकडून घेतला जाणार असल्यामुळे सगळ्यांचेच लक्ष दिल्लीतून काय घोषणा होते याकडे सोमवारी लागले होते.

**विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या महाविजयानंतर स्वाभाविकपणे गेले दोन दिवस राज्यात एकच प्रश्न सातत्याने चर्चेत राहिला आहे. तो म्हणजे आता राज्याची धुरा कुणाच्या खांद्यावर दिली जाणार? विधानसभेच्या अत्यंत आव्हानात्मक अशा निवडणुकीची लढाई महायुतीचे सारेच नेते एकदिलाने लढले. निवडणुकीत महायुती जिंकणे महत्त्वाचे आहे, मुख्यमंत्री कोण होणार हे महत्त्वाचे नाही याचा महायुतीच्या साऱ्याच नेत्यांनी वारंवार पुनरुच्चार केला, पण निकालानंतर मात्र त्यांना हाच प्रश्न जिथे तिथे विचारला जाणेही स्वाभाविक होते. निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला १३२ जागा मिळाल्याने राज्यातील सत्तेचे अवघे गणित बदलले आहे. या ऐतिहासिक कामगिरीनंतर भाजपने मुख्यमंत्रिपदावर दावा करणे स्वाभाविकच आहे अशी चर्चा त्यामुळेच लागलीच सुरू झाली आणि मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचे नाव आघाडीवर आले. या महाविजयात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे, व्यूहरचनेचे आणि अफाट परिश्रमांचे श्रेय मोठे आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. भाजप १३२ आमदारांचा पक्ष झाला असताना एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद दिल्यास राज्यातील भाजपचे कार्यकर्ते व आमदार यांच्यात अस्वस्थता निर्माण होईल यावरही भर दिला जाऊ लागला. अर्थात, शिवसेनेला ५७ जागा मिळाल्याने शिंदे यांचा विजयाला लागलेला हातभार दुर्लक्षित करता येण्याजोगा नसल्याने मुख्यमंत्रिपदाचा निर्णय राजधानी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा या शीर्षस्थ नेत्यांकडूनच घेतला जाईल हे सोमवारी पूर्ण स्पष्ट झाले आणि देवेंद्र फडणवीस त्यांच्या भेटीसाठी दिल्लीला रवानाही झाले. शिंदे आणि अजित पवार यांना सोमवारी तरी या भेटीसाठी बोलावले जाणार नाही हेही दिवसअखेरीपर्यंत स्पष्ट झाले. एकनाथ शिंदे यांना पहिली अडीच वर्षे पुन्हा संधी देण्यात यावी अशी मागणी त्यांच्या पक्षाकडून झाली. तशी ती होणार हे अपेक्षित होते, पण महायुतीतील तिसरा घटक पक्ष, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने मात्र फडणवीस यांच्या नावालाच पसंती देत राजकीय प्रगल्भता दर्शवली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीत रविवारी अजित पवार यांची राष्ट्रवादी पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. राष्ट्रवादी नेत्यांच्या बैठकीत मुख्यमंत्रिपदावरून झालेल्या चर्चेत फडणवीस यांच्याच नावाचा दिल्लीत आग्रह धरण्याचा निर्णय झाल्याचे सांगण्यात आले. शिंदे यांच्यापेक्षा कधीही फडणवीस आमच्यासाठी अधिक योग्य आहेत अशी प्रतिक्रियाही राष्ट्रवादीच्या उच्चपदस्थांकडून व्यक्त करण्यात आली. मुख्यमंत्रिपदाची माळ देवेंद्र फडणवीस यांच्याच गळ्यात पडणार असल्याचे जवळपास निश्चित झाले असल्याचेही सोमवारी संध्याकाळी सांगितले जात होते. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मंजुरी दिली असून शिवसेना आणि राष्ट्रवादीनेही या निर्णयाला होकार दिला आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असतील अशी चर्चा समाजमाध्यमांवर रंगली. फडणवीस यांच्या नावावर जवळपास शिक्कामोर्तब झाल्याचे वृत्त आल्याने भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये अत्यंत आनंदाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे.**

# रायगडात महायुतीचा पुन्हा एकदा बोलबाला



खबरबात
धम्मशील सावंत

राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. यामध्ये रायगड जिल्ह्यात भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी व मित्रपक्षांच्या महायुतीने पुन्हा एकदा आपला करिष्मा दाखवून दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर भारतीय जनता पक्ष), कर्जत मतदारसंघात आमदार महेंद्र थोरवे (शिवसेना), उरण मतदारसंघात आमदार महेश बालदी (भारतीय जनता पक्ष), पेण मतदारसंघात आमदार रविशेठ पाटील (भारतीय जनता पक्ष), अलिबाग मतदारसंघात आमदार महेंद्र दळवी (शिवसेना), श्रीवर्धन मतदारसंघात आदिती तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस) आणि महाड मतदारसंघात आमदार भरत गोगावले (शिवसेना) असे सर्वच्या सर्व महायुतीचे आमदार पुन्हा निवडून आले आहेत.

**मतदारसंघनिहाय उमेदवार व पडलेली मते**

पनवेल : आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर भारतीय जनता पक्ष, चिन्ह कमळ) एक लाख ८३ हजार ९३१ विजयी, गजेंद्र कृष्णदास अहिरे (बहुजन समाज पार्टी, चिन्ह हत्ती) १५२६, योगेश जनार्दन चिले (महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चिन्ह रेल्वे इंजिन) १०२३१, लीना अर्जुन गरड (शिवसेना उबाठा, चिन्ह मशाल) ४३९८९, कांतीलाल हरिश्चंद्र कडू (लोकमुद्रा जनहित पार्टी, चिन्ह सतार) २४२९, पवन उत्तमराव काळे (भारतीय जनसम्राट पार्टी, चिन्ह पाटी) ४७७, बाळाराम दत्तात्रेय पाटील (पिझंटस् ॲण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया, चिन्ह शिट्टी) १,३२,८४०, डॉ.वसंत उत्तम राठोड (डिजिटल ऑर्गनायजेशन ऑफ नेशन, चिन्ह ट्रम्पेट) १०३८, संतोष शरद पवार (रिपब्लिकन सेना, चिन्ह गॅस सिलेंडर) १७२९, चेतन नागेश भोईर (अपक्ष, चिन्ह पेनड्राईव्ह) ४४६, प्रकाश रामचंद्र चांदीवडे (अपक्ष, चिन्ह कढई) २६४, बाळाराम गौऱ्या पाटील (अपक्ष, चिन्ह चिमणी) ४६३, बाळाराम महादेव पाटील (अपक्ष, चिन्ह माईक) ६९६.

कर्जत : आमदार महेंद्र सदाशिव थोरवे (शिवसेना, चिन्ह धनुष्यबाण) ९४ हजार ८७१ विजयी, नितीन नंदकुमार सावंत (शिवसेना उबाठा, चिन्ह मशाल) ४८ हजार ९२९, श्रीराम बळीराम महाडिक (बसपा, चिन्ह हत्ती) एक हजार ०६४, जाविद आकदस खोत (अपक्ष, चिन्ह बॅट) ३७०, महेंद्र लक्ष्मण थोरवे (अपक्ष, चिन्ह भालाफेक) २२६, विशाल विष्णू पाटील (अपक्ष, चिन्ह एअर कंडिशनर) ३३०, सुधाकरभाऊ परशुराम घारे (अपक्ष, चिन्ह ऑटोरिक्षा) ८९ हजार १७७, सुधाकर यादवराव घारे (अपक्ष, चिन्ह ट्रक) दोन हजार ३६१, सुधाकर शंकर घारे (अपक्ष, चिन्ह ट्रम्पेट) ७१५.

उरण : आमदार महेश बालदी (भारतीय जनता पक्ष, चिन्ह कमळ) ९५ हजार ३९० विजयी, मनोहर गजानन भोईर (शिवसेना उबाठा, चिन्ह मशाल) ६९ हजार ८९३, ॲड. सत्यवान पंढरीनाथ भगत (महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चिन्ह रेल्वे इंजिन) २४६१, सुनील मारुती गायकवाड (बहुजन समाज पक्ष, चिन्ह हत्ती) ५९७, कृष्णा पांडुरंग वाघमारे (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक, चिन्ह सिंह) ३५०, प्रीतम जे.एम. म्हात्रे (पिझंटस ॲण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया, चिन्ह शिट्टी) ८८ हजार ८७८, महेश गणपत कोळी (लोकराज्य पार्टी, चिन्ह जहाज) ३९९, कुंदन प्रभाकर घरत (अपक्ष, चिन्ह बॅट) १७७, निलम मधुकर कडू (अपक्ष, चिन्ह ट्रम्पेट) २८२, प्रीतम धनाजी म्हात्रे (अपक्ष, एअर कंडिशनर) ४३१, प्रीतम बळीराम म्हात्रे (अपक्ष, चिन्ह कपाट) २०७, बाळकृष्ण धनाजी घरत (अपक्ष, चिन्ह किटली) २५५, मनोहर भोईर (अपक्ष, चिन्ह नरसाळे) ५३९, श्रीकन्या तेजस डाकी (अपक्ष, चिन्ह गॅस सिलेंडर)१०३६.

पेण : आमदार रविशेठ पाटील (भारतीय जनता पार्टी, चिन्ह कमळ) एक लाख २४ हजार ६३१ विजयी, प्रसाद भोईर (शिवसेना उबाठा, चिन्ह मशाल) ६३ हजार ८२१, अनुजा केशव साळवी (बहुजन समाज पार्टी, चिन्ह हत्ती) एक हजार २४१, अतुल नंदकुमार म्हात्रे (पिझंटस ॲण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया, चिन्ह शिट्टी) २९ हजार १९१, देवेंद्र मारुती कोळी (वंचित बहुजन आघाडी, चिन्ह गॅस सिलेंडर) एक हजार ७०१, मंगल परशुराम पाटील (अभिनव भारत पार्टी, चिन्ह माईक) दोन हजार २६६, विश्वास मधुकर बागुल (अपक्ष, चिन्ह इस्त्री) एक हजार २०३.

अलिबाग : आमदार महेंद्र हरी दळवी (शिवसेना, चिन्ह धनुष्यबाण) एक लाख १३ हजार ५९९ विजयी, अनिल बबन गायकवाड (बहुजन समाज पार्टी, चिन्ह हत्ती) ७३०, चित्रलेखा नृपाल पाटील ऊर्फ चिऊताई (पिझंटस ॲण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया, चिन्ह शिट्टी) ८४ हजार ३४, अजय श्रीधर म्हात्रे (अपक्ष, चिन्ह हार्मोनियम) ४३९, अमर रवींद्र फुंडे (अपक्ष, चिन्ह रुम कुलर) १४१, आनंद रंगनाथ नाईक (अपक्ष, चिन्ह टायर्स) ६६६, दिलीप गोविंद भोईर (अपक्ष, चिन्ह बॅट) ४१०, दिलीप विठ्ठल भोईर ऊर्फ छोटम शेठ (अपक्ष, चिन्ह बॅटरी टॉर्च) ३३ हजार २१०, महेंद्र दळवी (अपक्ष, चिन्ह विजेचा खांब) १९५, महेंद्र दळवी (अपक्ष, चिन्ह सायकल पंप) १५६, महेंद्र दळवी, (अपक्ष, चिन्ह मोत्यांचा हार) १८६, मंदार एकनाथ गावंड (अपक्ष, चिन्ह दूरदर्शन) ३५३, श्रीनिवास सत्यनारायण मटपरती (अपक्ष, चिन्ह रोड रोलर) एक हजार १४६, सुभाष ऊर्फ पंडित पाटील (अपक्ष, चिन्ह ऑटोरिक्षा) एक हजार ७७.

श्रीवर्धन : आमदार आदिती सुनील तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस, चिन्ह घड्याळ) एक लाख १६ हजार ५० विजयी, अनिल दत्ताराम नवगणे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस) ३३ हजार २५२, अश्विनी उत्तम साळवी (बहुजन समाज पार्टी, चिन्ह हत्ती) ७१८, फैजल अब्दुल अजीज पोपेरे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चिन्ह रेल्वे इंजिन) दोन हजार १२५, अनंत बाळोजी गीते (अपक्ष, चिन्ह ग्रामोफोन) ३७३, अशरफ खान दादाखान पठाण (अपक्ष, चिन्ह चालण्याची काठी) १३४, कृष्णा पांडुरंग कोबनाक (अपक्ष, चिन्ह बॅट) ४९०, मोहम्मद कासीम बुरहानुद्दीन सोलकर (अपक्ष, चिन्ह खाट) एक हजार ५८९, युवराज प्रकाश भुजबळ (अपक्ष, चिन्ह गॅस सिलेंडर) ४१२, राजाभाऊ ठाकूर (अपक्ष, चिन्ह लिफाफा) चार हजार ८०, संतोष तानाजी पवार (अपक्ष, चिन्ह ट्रम्पेट) एक हजार ३४१.

महाड : भरत मारुती गोगावले (शिवसेना, चिन्ह धनुष्यबाण) एक लाख १७ हजार ४४२ विजयी, स्नेहल माणिक जगताप (शिवसेना उबाठा, चिन्ह मशाल) ९१ हजार २३२, आनंदराज रवींद्र घाडगे (वंचित बहुजन आघाडी, चिन्ह गॅस सिलेंडर) एक हजार ५१०, अमृता अरुण वाघमारे (बहुजन समाज पार्टी, चिन्ह हत्ती) एक हजार २१८, प्रज्ञा लक्ष्मण खांबे (अपक्ष, चिन्ह चिमणी) एक हजार ३४.



बदलते तंत्रज्ञान

## 'जिओ'चा वर्षभरासाठी नवा अनलिमिटेड ५जी डेटा प्लॅन

एखाद्याला घरबसल्या पैसे पाठवण्यापासून ते अगदी वीज बिल भारण्यापर्यंत आपण सगळेच स्मार्टफोनचा वापर करतो, पण ही सगळी काम करण्यासाठी मोबाईलमध्ये नेट हवं असतं. जिओ आपल्या युजर्ससाठी नवनवीन आणि चांगले प्लॅन लाँच करत असते. आता जिओनं आपल्या युजर्ससाठी एक नवा आणि जबरदस्त प्लॅन लाँच केला आहे. जिओचा हा नवा रिचार्ज प्लॅन खास करून त्यांच्यासाठी आहे ज्यांना जास्त डेटाची गरज आहे. जाणून घेऊया जिओच्या या नव्या रिचार्ज प्लॅनबद्दल. जिओच्या नव्या रिचार्ज प्लानची किंमत ६०१ रुपये आहे. ६०१ रुपयांच्या या प्लानमध्ये तुम्ही अनलिमिटेड डेटाचा लाभ घेऊ शकता.




जिओच्या प्लॅनमध्ये दररोज दोन जीबी डेटा मिळतो. केवळ त्याच प्लॅनमध्ये अनलिमिटेड ५जी डेटाही मिळतो. जिओच्या ६०१ रुपयांच्या प्लॅनमध्ये युजर्स संपूर्ण एक वर्षासाठी अनलिमिटेड ५जी डेटाचा लाभ घेऊ शकतात. या प्लॅनमध्ये युजर्सला १२ डेटा व्हाउचर मिळतात. व्हाउचरची किंमत ५१ रुपये आहे. या प्लॅनमध्ये युजर्स आता डेली १.५ जीबी डेटा असलेल्या प्लॅनमध्येही अनलिमिटेड ५जी डेटाचा फायदा घेऊ शकतात. हा प्लॅन जिओचा एक प्रकारचा डेटा व्हाउचर प्लॅन आहे, जो एक वर्षासाठी वापरला जाऊ शकतो.

जिओचा हा प्लॅन फक्त तेच युजर्स वापरू शकतील ज्यांच्याकडे ५जी फोन आहे आणि त्यांच्या भागात ५जी नेटवर्क उपलब्ध आहे. याशिवाय हा प्लॅन वापरण्यासाठी युजरकडे आधीपासूनच ॲक्टिव्ह प्लॅन असणं आवश्यक आहे.

जिओने परवडणारे डेटा पर्यायदेखील सादर केले आहेत. यामध्ये ११ रुपयांचा नवीन प्लॅन, एका तासासाठी १०जीबी डेटा ऑफर करतो, हा लाइनअपमधील सर्वात स्वस्त रिचार्ज आहे. तसेच यामध्ये ४९रु. १७५ रु. २१९रु. २८९ आणि रु. ३५९ च्या इतर पर्यायांना जोडते, या सर्वांमध्ये व्हॉईस आणि एसएमएस फायदे नाहीत.

अशाप्रकारे जर तुम्ही कमीत कमी किमतीमध्ये जास्तीत जास्त वैधता असलेला प्लॅन शोधत असाल, तर जिओचा हा प्लॅन तुमच्यासाठी अत्यंत चांगला असा प्लॅन आहे. तुम्ही एकदा प्लॅन घेतल्यावर ११ महिने तुम्हाला रिचार्ज करण्याची काहीच गरज भासणार नाही. त्याचप्रमाणे जर तुम्ही कमी इंटरनेट डेटा वापरत असाल, तर हा प्लॅन तुमच्यासाठी अत्यंत उत्कृष्ट आहे.

# चित्रपट महर्षी भालजी पेंढारकर

भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणाऱ्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार म्हणजे भालजी पेंढारकर. त्यांची आज पुण्यतिथी...

भालजींचा जन्म ३ मे १८९८ रोजी कोल्हापूर संस्थानचे तत्कालीन सहायक शल्यचिकित्सक डॉ. गोपाळराव आणि राधाबाई पेंढारकर यांच्यापोटी कोल्हापुरात झाला. निर्माते-अभिनेते बाबूराव पेंढारकर हे त्यांचे ज्येष्ठ बंधू. चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुणवयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहूमहाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करत ते कोल्हापूरला परतले.

भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली, पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक विशेषतः लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचे निधन झाले, तेव्हा व्यथित झालेल्या भालजींनी लोकमान्यांचा स्वर्गीय संदेश ही पुस्तिका लिहून प्रकाशित केली आणि चौकाचौकात विकली.



निमित्त

भालजींच्या लिखाणाचा श्रीगणेश अशा प्रकारे झाला. पुण्यातल्या 'लक्ष्मी' थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी (सोहराब मोदींचे बंधू) यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मिळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१च्या सुमारास ते गणेशपंत ऊर्फ बाबाराव सावरकरांच्या संपर्कात आले. भालजींवर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर ऊर्फ तात्यारावांच्या आणि बाबाराव सावरकरांच्या विचारसरणीचा प्रभाव पडला, परिणामस्वरूप त्यांनी 'हिंदुस्तान मंडळा'त सहभागी होत क्रांतिकार्याची शपथ घेतली आणि पुढे तेच त्यांच्या जीवितकार्याचे सूत्र बनले.

या काळात भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला. त्यांनी असीरे हर्स या उर्दू नाटकाचे केलेले मराठी रूपांतर आसुरी लालसा (१९२५) हे रुस्तमजी यांच्या आर्य सुबोध नाटक मंडळीतर्फे रंगमंचावर आले व खूप गाजले. पुढे भालजींनी मार्कंडेय (अपूर्ण), रजहृदय, उदयकाळ, जुलूम, राणीसाहेब, खूनी खंजर, बाजीराव-मस्तानी, वंदे मातरम् -आश्रम, बाजबहाद्दूर अर्थात राणी रूपमती या मूकपटांचे लेखन आणि त्यातल्या काहींचे दिग्दर्शनही केले. बकंभट या व्यंगपटाचे लेखन-दिग्दर्शन केल्यानंतर त्यांनी सरस्वती सिनेटोन या चित्रसंस्थेच्या श्यामसुंदर (१९३२) या पौराणिक बालचित्रपटाची दिग्दर्शन-पटकथा-संवाद-गीते अशी आघाडी संभाळली. भारतातील हा पहिला बालचित्रपट हिंदी आणि बंगालीमध्ये निर्माण झाला होता तसेच पहिला रौप्यमहोत्सवी चित्रपट होण्याचा मानही त्याने मिळवला.

भालजींनी कोल्हापूर सिनेटोन, श्याम सिनेटोन, अरुण पिक्चर्स, सरस्वती सिनेटोन, शालिनी सिनेटोन इत्यादी चित्रसंस्थांच्या चित्रपटांच्या दिग्दर्शनाची किंवा कथा-पटकथा-संवाद यांची जबाबदारी सांभाळली. तब्बल ४५ चित्रपट त्यांनी चित्रपटसृष्टीला दिले. भालजींचे कोल्हापूर येथे २६ नोव्हेंबर १९९४ रोजी निधन झाले

**-अरुण पुराणिक (मराठी विश्वकोष)**

**क्लिक...क्लिक...!**



**रसायनी : भाजप आमदार महेश बालदी यांच्या विजयानंतर आपटा गावात करण्यात आलेला जल्लोष.** (छाया : बी.एस. कुलकर्णी)

आरोग्य प्रहर

## हे पाच ज्यूस प्या, वयाचा नाही लागणार पत्ता

लोक वेगवेगळ्या प्रकारचे ज्यूस पितात आणि या ज्यूस आरोग्याला अनेक फायदेही होतात. ज्यूसमुळे शरीरातील पोषक तत्वांची कमतरता भरून निघते. ज्यूस तुमच्यासाठी किती फायदेशीर आहे हे यावर अवलंबून असतं की, ज्यूस तयार करण्यासाठी कोणत्या भाज्या आणि फळांचा वापर करता.



नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नोलॉजी इंफॉर्मेशननुसार, काही भाज्या किंवा फळांच्या ज्यूसचं सेवन करणं खूप फायदेशीर असतं. ज्यूससाठी आम्ही हाय अँटी-ऑक्सिडेंट् आणि व्हिटॅमिन्सयुक्त फळ-भाज्यांची निवड केली पाहिजे. जेणेकरून आवश्यक पोषक तत्व मिळावेत.

**पत्ता कोबी ज्यूस**

पत्ता कोबीची भाजी तुम्ही अनेकदा खात असाल. मात्र, याच्या ज्यूसमध्येही आरोग्यासाठी आवश्यक अनेक तत्व असतात. या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असतं, ज्याने इम्यून सिस्टीम मजबूत होतं आणि इन्फेक्शनसोबत लढण्यास मदत मिळते. यात एंथोसायनिन आणि फाइटोन्यूट्रिएंट्स नावाचे गुण असतात. या अँटी-ऑक्सिडेंट्सने शरीराचा फ्री रॅडिकल्सपासून बचाव होतो. ज्यामुळे वय वाढण्याची प्रक्रिया स्लो होते.

**काकडीचा ज्यूस**

व्हिटॅमिन के ची कमतरता भरून काढण्यासाठी काकडीच्या ज्यूसचं सेवन करणं फायदेशीर असतं. काकडीने शरीर डिटॉक्स होण्यासही मदत मिळते. काकडीच्या ज्यूसचं तुम्ही वेगवेगळ्या पद्धतीने सेवन करू शकता. जसे की, पुदीना आणि लिंबूचा रस मिक्स करून ज्यूस बनवणे.

**संत्र्याचा ज्यूस**

संत्र्याच्या ज्यूसमध्ये भरपूर अँटी-ऑक्सिडेंट्स असतात जे शरीराचा फ्री रॅडिकल्सपासून बचाव करतात. ज्यामुळे वय वाढण्याची प्रक्रिया स्लो होते. या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असतं, ज्यामुळे इम्यून सिस्टीम मजबूत होतं आणि इन्फेक्शनपासून बचावही होतो.

**द्राक्षाचा ज्यूस**

द्राक्षाच्या ज्यूसमध्ये रिस्वेराट्रोलसारखे अँटी-ऑक्सिडेंट असतात, जे शरीराचा फ्री रॅडिकल्सपासून बचाव होतो आणि वय वाढण्याची प्रक्रिया स्लो होते. या ज्यूने हृदयाचं आरोग्यदेखील चांगलं राहतं. ब्लड प्रेशर नियंत्रित राहतं आणि हृदयरोगांचा धोका टाळला जातो. तसेच यात फायबर भरपूर असल्याने पचनक्रियाही चांगली राहते.

# माथेरानमध्ये महायुतीचा विजयोत्सव

**माथेरान : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे ५७६१ मतांनी दुसऱ्यांदा विजयी झालेअसून माथेरानशहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात गुलालाची उधळण करीत जल्लोषात विजयोत्सव साजरा केला. या वेळी माथेरान शहरातील महायुतीचे सर्व आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला आघाडी, युवा सेना, युवती सेना मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या अटीतटीच्या लढतीत महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी पुन्हा विजयश्री खेचून आणली असून कर्जत विधानसभेवर पुन्हा भगवा फडकवला आहे. काटे की टक्कर असलेल्या मतदार संघात महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांचा ५७६१ मतांनी पराभव करून पुन्हा एकदा आपला गड राखला आहे. महेंद्र थोरवे यांना विजयी घोषित करताच संपूर्ण तालुक्यात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा करण्यास सुरुवात केली.संपूर्ण तालुक्यात विजयोत्सव साजरा होत असताना माथेरान शहरात पण महायुतीच्या कार्यकर्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोषात विजयोत्सव साजरा केला.

या वेळी शिवसेना शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, शहर संघटक मनोज खेडकर शिवाजी शिंदे, प्रमोद नायक, निखिल शिंदे, गौरंग वाघेला, भास्कर शिंदे, अकबर मुजावर, अनिस शेख, प्रकाश सुतार, योगेश जाधव, वसंत कदम, आलम मुजावर, सागर पाटील, नितेश कदम, राकेश कोकळे, हर्ष शिंदे, अमोल चौगुले, आदेश घाग, लक्ष्मण कदम, तुकाराम आखाडे, अरविंद रांजणे, दत्ता शिंगाडे, संतोष आखाडे, अशोक वाघेला, शुभम गायकवाड, अंबालाल वाघेला, भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष प्रविण सकपाळ,किरण चौधरी, विलास पाटील, राकेश चौधरी, चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे, आकाश चौधरी, मनोहर रांजणे, शुभास भोसले, राजेश चौधरी, शैलेश चाफेरकर तसेच भाजपा महिला कार्यकर्त्या प्रतिभा घावरे, गीता जाधव, रोशनी रांजणे, बिना कदम, जयश्री मालुसरे तर शिवसेना महिला आघाडी अध्यक्षा संगीता जांभळे, प्रीती कळंबे, रेखा चौधरी, अर्चना भिल्लारे, श्रुतिका दाभेकर, वर्षा शिंदे, अंकिता तोरणे,मनाली रांजणे, कामिनी शिंदे, योगिता रांजणे, रिझवाना शेख, सविता जाधव यांच्या सह गावातील नागरिक मोठ्या संख्येने या आनंदोत्सवात स्वेच्छेने सहभागी झाले होते.

> **महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांनी पहिल्या टर्मचे आमदार असताना माथेरान पर्यटनस्थळी मोठा निधी उपलब्ध करून देत अनेक विकासकामे केली आहेत. त्यामुळे माथेरान शहरातून महायुतीच्या कार्यकर्त्यांनी अधिक मेहनत घेत त्यांना सर्वाधिक मताधिक्य दिले आहे.**
> **-राकेश कोकळे,**
> **सामाजिक कार्यकर्ते**

# साजगाव यात्रेचा झगमगाट वाढला

## खाऊगल्ली व मासळी बाजार बनले उलाढालीचे केंद्र

**खोपोली : प्रतिनिधी**

साजगांव-ताकई येथे विठ्ठल मंदिर परिसरात कार्तिकी एकादशीपासून प्रसिद्ध बोंबल्या विठोबाची यात्रा सुरू आहे. सतत पंधरा दिवस चालणारी कोकण विभागातील ही एकमेव मोठी यात्रा आहे. रविवारी सुट्टीच्या दिवसापासून दुसऱ्या आठवड्यात मात्र यात्रेत मोठी गर्दी होत आहे.



शनिवार, रविवार या दोन दिवसांत विशेषतः शनिवारी व विवारी येथील व्यवसाय व आर्थिक उलाढालीला झळाळी प्राप्त झाली. यातही सौंदर्यप्रसादने दुकाने, खााऊगल्ली, मिठाई व सुखी मासळी बाजारात मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन येथे सर्वाधिक आर्थिक उलाढाल होत असल्याने व्यापारी वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, शुक्रवार पासून यात्रा परिसरात येणाऱ्या खोपोली पेण मार्ग सहित अन्य सर्वच मार्गांवर संध्याकाळी पाच ते रात्री नऊ वाजेपर्यंत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने, यावेळत यात्रेकरू सहित नौकरदार व सर्वसामान्य नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे.

धाकटी पंढरी अशी ओळख असलेल्या साजगांव यात्रेचा दुसरा आठवडा सुरू आहे. विधानसभा मतदान पार पडल्यानंतर शुक्रवार पासून मोठ्या प्रमाणावर यात्रेकरूंची गर्दी होत आहे. शनिवारी तर यात्रेत पाय ठेवायला जागा नाही अशी स्थिती होती. रविवारी ही गर्दी कायम राहिल्याने स्थानिक पोलीस प्रशासन, वाहतूक शाखा कडून खास नियोजन करण्यात आले होते. रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने सकाळपासूनच गर्दी होण्यास सुरुवात झाली. दुपारनंतर तर यात्रेत पाय ठेवता येणार नाही एवढी गर्दी दिसली. यामुळे मागील काही दिवसांतील येथील निरुत्साही वातवरण संपुष्टात आले आहे. या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात मालाची विक्री होऊन उत्तम आर्थिक उलाढाल होत असल्याचे व्यापारी वर्गाने सांगितले. गर्दीचा हा उत्साह शेवटच्या दिवसापर्यंत कायम राहणार असून, यात्रेतील उंच उंच पाळणे, रोमहर्षक खेळ, खाऊ गल्ली, खेळणी बाजार, मिठाई गल्ली व सुख्यामासळी बाजार सर्वांचे आकर्षण ठरत आहे. यात्रेत सहकुटुंब आलेली बच्चे कंपनी व तरुणांची प्रचंड गर्दी होत आहे. सुकीमासळीची खरेदी व खास आकर्षण असलेल्या गरमागरम जिलेबीचा अस्वाद खवय्यांकडून मनमुरादपणे घेतला जात आहे.

उत्तम व योग्य दरात चांगली सुकीमासळी येथे मिळत असल्याने साजगावची यात्रेत सुकी मासळी खवय्यांसाठी मोठी प्रवर्णी ठरते. खोपोली शहर, पनवेल, पाली सुधागड, पेण, खालापूर कर्जत तालुक्यातील व घाट माथ्यावरील हजारो कुटूंब व नागरिक या यात्रेत खास सुकी मासळी खरेदी करण्यासाठी येतात. दरम्यान, गर्दीच्या काळात कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी खोपोली पोलीस, यात्रा कमिटी, खोपोली नगरपालिका प्रशासन कडून सर्व खबरदारी घेण्यात येत आहे.

सुक्या मासळीचे दर मागील वर्षांपेक्षा दहा ते पंधरा टक्के वाढल्याचे दिसत असून, यावर्षी बोंबील -२५० ते २६०, सुकट-२५० ते ३००, सोडे -८०० ते १२००, दांडी सुकट -२५० ते ३५०, अंबाडी सुकट -२५० ते ३००, ढोमे -१८० ते २५०, मांदेली -२०० ते २५०, वाकटी -२६० ते २७०, सुरमई -७०० ते ८००, माकली -४०० ते ४५०, बांगडे -१६० ते २५० प्रती किलोच्या भावाने विक्री होत आहेत. प्रत्येक दुकानाचा दररोजचा व्यवसाय पन्नास हजार ते एक लाखाचा घरात होत असून, शेवटच्या दोन तीन दिवसांत यात वाढ होवून साधारण सरासरी चार पाच लाखाच्या आसपास हा व्यवसाय जाईल, असे यात्रेतील मासळी व्यावसाहीकांनी सांगितले.

# आमदार महेंद्र थोरवेंचे मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

**चौक, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत खालापूर विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार महेंद्र थोरवे यांचा दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्कार करून अभिनंदन केले.



कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्याबद्दल मुंबई येथे सत्कार करण्यात आला. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कर्जत-खालापूरकरांचे मी मनःपूर्वक आभार मानतो की, तुम्ही शिवसेना पक्षावर विश्वास ठेवला आणि महेंद्र थोरवे यांना पुन्हा संधी दिली. तुम्हा सगळ्यांचा विश्वास महेंद्र थोरवे दुपटीने विकासकामांतून सार्थ ठरवेल, याची मला खात्री आहे. या शब्दांनी सर्व उपस्थितांचा उत्साह वाढवला.

आमदार महेंद्र थोरवे यांनीही मतदारांचे आभार मानत मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सत्कार स्वीकारताना आमदार महेंद्र थोरवेंसोबत आमदार भरत गोगावले, विधान परिषद माजी उपसभापती निलम गोऱ्हे उपस्थित होते.

# भाजपच्या चार पदाधिकाऱ्यांचे सहा वर्षांसाठी निलंबन

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीची रणधुमाळी संपल्यानंतर भारतीय जनता पक्षाने अलिबाग मतदार संघातील चार पदाधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. याबाबत पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांनी प्रसिदधी पत्रक काढले आहे. पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका या चौघांवर ठेवण्यात आला आहे.

कारवाई झालेल्यांमध्ये पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयवंत अंबाजी, जिल्हा चिटणीस महेंद्र चौलकर, जिल्हा चिटणीस परशुराम म्हात्रे आणि ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष समीर राणे यांचा समावेश आहे. पक्षविरोधी कारवाई केल्याने यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी बंडखोरी केली. अलिबाग विधानसभा मतदार संघात भोईर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. पक्षाने सांगूनदेखील त्यांनी आपली उमेदवारी कायम ठेवली. त्यामुळे त्यांच्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. आता निलंबित करण्यात आलेल्या चौघांनी महायुतीचे काम न करता दिलीप भोईर यांचे काम केल्याने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याचे समजते. यासंदर्भातील पत्र प्रसार माध्यमांना देण्यात आले.

# पर्यटकांची ई-रिक्षाला मोठी पसंती

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी हिवाळी हंगाम सुरू असून विकेंडला पर्यटक मोठ्या प्रमाणावर माथेरानला येत आहेत. माथेरान पर्यटनस्थळी सुरू असलेल्या ई-रिक्षाच्या प्रवासासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होताना दिसत आहे. ई-रिक्षांची संख्या कमी असल्याने ई-रिक्षासाठी पर्यटकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.



माथेरान पर्यटनस्थळी हिवाळी हंगामात विकेंडला पर्यटकांची संख्या नेहमीच वाढलेली असते. येथील गुलाबी थंडीचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर या पर्यटनस्थळी येत असतात. या सुंदर माथेरान पर्यटनस्थळी प्रायोगिक तत्त्वावर पर्यावरण पूरक ई-रिक्षा सुरू आहेत. स्वस्त आणि सुरक्षित प्रवास येथे येणाऱ्या पर्यटकांना मिळत असल्याने पर्यटकांची ई-रिक्षाला मोठी पसंती मिळताना दिसत आहे, मात्र या ठिकाणी सध्या ई-रिक्षांची संख्या कमी असल्याने येथे ई-रिक्षा थांब्यावर पर्यटकांच्या लांबच लांब रांगा लागले ल्या दिसत आहेत. स्वस्त आणि सुरक्षित ई-रिक्षाचा प्रवास करण्यासाठी पर्यटक तासनतास ई-रिक्षाच्या थांब्यावर रांगेत उभे असलेले पाहवयास मिळत आहेत.

ई-रिक्षांची संख्या कमी असूनदेखील पर्यटक ई-रिक्षाला मोठी पसंती देताना दिसत आहेत. त्यामुळे येथे ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करावी, अशी मागणी आता पर्यटकसुद्धा करताना दिसत आहेत. ई-रिक्षांची संख्या कमी असूनदेखील ई-रिक्षा कर्मचारी येथील स्थानिक नागरिक आणि पर्यटकांना उत्तमप्रकारे सेवा पुरविण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.



**महाड : विधानसभा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा निवडून आल्यावर आमदार भरत गोगावले यांनी आपल्या कुटुंबियांसमवेत व मित्र परिवारासह विजयाचा जल्लोष केला.**



**माणगाव : श्रीवर्धन विधानसभा निवडणुकीत निवडून आल्याबद्दल मंत्री आदिती तटकरे यांचे उद्योजक विजयशेठ मेथा यांनी अभिनंदन केले.**
(छाया : सलीम शेख)

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.२४) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ४२३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून तीन लाख ७६ हजार ८०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांची मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत खरेदी करण्यासंबंधी जमीन मालक यांचेसोबत विचार विनिमय, बोलणी, चर्चा चालू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड.

| मौजे | भोगवटा धारकाचे नाव | जुना/ सर्व्हे नं. | नवीन सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| माणगाव तर्फे वरेडी | विजय रामकिसन झंवर | ११४/१ | ९९/१ | ०-७४-४० ०-०७-४० |
| माणगाव तर्फे वरेडी | विजय रामकिसन झंवर | ११४/२ | ९९/२ | ०-७०-०० ०-०६-०० |

सदरची जमीन मोजणी करुन कुंपणासह बंधिस्त केलेली आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ता. २५-११-२४
पनवेल

**सही/-**
**ॲड. वाय. एस. भोपी**

१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड.
मोबाईल : ९८२०२७३६९१



प्रोसेफ फी जमा रू. अर्जदारातर्फे ॲड. सोनिया नारायण शिरसाठ

## जाहीर नोटीस

दिवाणी चौकशी अर्ज क्र. १३२३ / २३
नि. क्र. ७
एन.डी. १०/१२/२४

**मे. प्रथमवर्गदंडाधिकारी साहेब सी.बी.डी. बेलापूर, वाशी यांचे न्यायालयात**

कनिझ मुक्बल अहमद शेख ......... **अर्जदार**
विरुध्द
कोणीही नाही .......... जाबदार

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, कै. फतिमाबाई अब्दुल सत्तार शेख यांचे दिंनाक ०९.०६.२०२० रोजी घर नं. ६२७९/०१८, हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका-ठाणे, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र येथे मयत झाले असून त्यांचे कायदेशिर सरळ वारस म्हणून अर्जदार कनिझ मुक्बल अहमद शेख, रा. घर नं. ६२७९ / ०१८, हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका-ठाणे, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र यांनी खालील वर्णांच्या मिळकतीबाबत वारस दाखल मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

घर नं. ६२७९/०१८, हनुमान नगर, तुर्भे नाका, नवी मुंबई- ४००७०३
(लेखा क्र. VA0002214369) (सर्वे पावती क्र. डी झेड जी III 1751)

वरील अर्जदार हे मयत कै. फतिमाबाई अब्दुल सत्तार शेख यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील, तसेच अर्जदार हे कै. फतिमाबाई अब्दुल सत्तार शेख यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यास वारसदाखला मंजूर करील यांची दखल घ्यावी.

आज दिनाक ८/११/२४ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **ज्युनि. क्लार्क** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा. अधिक्षक**



## जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

**(सोसायटी ॲक्ट १८६०-क्र.४५/९२ मुंबई विश्वस्त अधिनियम १९५०-क्र.एफ१६१७)**

### वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना
### (फक्त सभासदांसाठी)

प्रति,
मा. सभासद

महोदय,

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची **चौतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा** गुरुवार दिनांक **२६ डिसेंबर २०२४** रोजी सायंकाळी ४.०० वाजता संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज (ऑटोनॉमस) प्लॉट नं.१, सेक्टर ११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे खालील कामांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास नियोजित वेळेच्या अर्ध्या तासानंतर तीच सभा त्याच ठिकाणी त्याच कामांचा विचार करण्यासाठी भरविण्यात येईल व अशा पुन्हा भरलेल्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

तरी आपण या सभेस अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**कामकाज पत्रिका**

१. ०७ डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज वृत्त वाचून कायम करणे.
२. मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयांना व केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
३. ज.भ.शि.प्र. संस्थेचे २०२३-२०२४ सालचे हिशोब तपासनिसांनी प्रमाणित केलेले जमाखर्च व ताळेबंद व हिशोब तपासनिसांचा अहवाल वाचून मंजूर करणे.
४. सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
५. सन २०२४-२०२५ सालाकरीता हिशोब तपासनिसांची नेमणूक करणे.
६. सन २०२४-२०२९ या कालावधीकरिता संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांची निवड करणे.
७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

**सही/-**
**मा. श्री. अरूण जगन्नाथ भगत**
**अध्यक्ष**
**जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल.**

**ठिकाण :- नवीन पनवेल**
**दिनांक :- २५ नोव्हेंबर २०२४**

टीप :- १. मा. सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील अगर प्रश्न विचारावयाचे असतील तर ते लेखी स्वरूपात सभेच्या ७ दिवस अगोदर पोहोचतील असे संस्था सचिवांकडे पाठवावेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा अगर सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.
२. ज्या सभासदांची निवासस्थाने बदलली असतील त्यांनी आपला बदललेला पत्रव्यवहाराचा पत्ता संस्थेच्या कार्यालयात कळवावा.
३. सन २०२४ ते २०२९ या कालावधीकरिता घेण्यात येणाऱ्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीबाबत सर्व आवश्यक ती माहिती संस्था कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात आली आहे.

# अभिनंदनाचा वर्षाव



पनवेल : विधानसभा निवडणुकीत चौथ्यांदा विजयी होण्याचा मान आमदार प्रशांत ठाकूर यांनी पटकावला आहे. त्याबद्दल पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटना, संस्थांचे प्रतिनिधी आणि अन्य मान्यवरांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आमदार प्रशांत ठाकूर विजयी झाल्याबद्दल अभिनंदन केले. या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, दिलीप पाटील, विकास घरत, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, आरपीआयचे महापालिका क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे, भाजप नेते प्रवीण खंडागळे, वासुदेव घरत, निर्गुण कवळे, विनोद घरत, रमेश पाटील, प्रकाश पाटील, रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांच्यासह रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयाबद्दल आनंद व्यक्त केला आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन केले.





पनवेल : विधानसभा निवडणुकीत सलग चौथ्यांदा विजयी होण्याचा मान आमदार प्रशांत ठाकूर यांनी मिळवला आहे. त्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.





# आगामी निवडणुकाही एकजुटीने लढून जिंकू -आमदार रविशेठ पाटील





**पेण : प्रतिनिधी**

महायुतीमधील कार्यकर्त्यांनी एकदिलाने केलेल्या कामामुळे पेण-सुधागड-रोहा मतदारसंघात भक्कम आघाडी घेऊन निवडून आलो आहे. आगामी निवणुकांमध्येही महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने लढून जिंकायचे आहे, असे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी मिरवणुकीच्या सांगता सभेत केले.

पेण मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील हे ६० हजार ८१० मतांची आघाडी घेऊन मोठ्या फरकाने निवडून आले. सकाळपासून सुरू झालेल्या मतमोजणी प्रक्रियेत पहिल्या फेरीपासूनच रविशेठ यांनी आघाडी घेतली होती. कार्यकर्त्यांना विजयाची खात्री असल्यामुळे सकाळपासून मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी वैकुंठ निवासस्थानी गर्दी केली होती. या वेळी कमळाचे ध्वज घेऊन रविशेठ पाटील तुम आगे बढो, देवेंद्र फडणवीस आगे बढो, एकनाथ शिंदेंचा विजय अशा विजयी घोषणा देण्यात येत होत्या. प्रांताधिकाऱ्यांनी रविशेठ हे विजयी झाल्याची घोषणा केल्यानंतर फटाक्याची आतषबाजी करण्यात आली. या वेळी भाजप कार्यालयापासून भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत खासदार धैर्यशील पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, माजी जि.प. अध्यक्ष निलिमा पाटील, माजी जि.प. सदस्य कौसल्या पाटील, प्रभाकर म्हात्रे, डी.बी. पाटील, माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी गटनेते अनिरुद्ध पाटील, झैन नाईक, युवा नेते ललित पाटील. जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, राजेश मपारा, अ‍ॅड. प्रशांत पाटील, सुषमा पाटील, प्रतिभा पाटील, तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, शहर अध्यक्ष हिमांशू कोठारी, पं.स. सदस्य प्रदीप पाटील आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी बोलताना आमार रविशेठ पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले की, या विजयात खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, शिवसेना पदाधिकारी, सर्व घटक पक्षांचे कार्यकर्ते यांच्यासह भाजप कार्यकर्त्यांचा मोलाचा वाटा आहे. कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे मोठे मताधिक्य घेण्यात महायुतीला यश आले.

माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील म्हणाल्या की, आमदार रविशेठ पाटील यांनी मतदारसंघात केलेली कामे व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जो प्रचार केला त्या जोरावर पेण मतदारसंघात मोठ्या मताधिक्क्याने आपण विजयश्री खेचून आणली. या वेळी त्यांनी पहिले जनतेची कामे करा आणि नंतरच या मतदारसंघावर आपला हक्क सांगायला या, असा टोला विरोधकांना लगावला.

विजयी मिरवणूक भाजप पक्ष कार्यालयापासून पेण नाका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महावीर मार्ग, खाटीक आळीमार्गे वैकुंठ निवासस्थानी येऊन तिची सांगता करण्यात आली. या दरम्यान खान मोहल्ला येथे आमदार रविशेठ पाटील यांच्यावर जेसीबीतून पुष्पवृष्टी करण्यात आली.

# पोलादपूरकरांनी साजरा केला आमदार गोगावलेंचा ऐतिहासिक विजयी चौकार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड विधानसभा मतदारसंघात आमदार भरत गोगावले यांनी सलग चौथ्यांदा विजय संपादन करीत नवा इतिहास घडविला आहे. ग्रामपंचायत निवडणुकीतून विधानसभेचा मार्ग सोपा होत असल्याचे या वेळी प्रत्येक बूथनिहाय मतांच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. पोलादपूरकरांनी शनिवारी मतमोजणीनंतर दुपारपासून रात्रीपर्यंत आमदार गोगावले यांचा विजयी चौकार जल्लोषात साजरा केला.

पोलादपूर शहरामध्ये ३४९, ३५०, ३५१, ३५२, ३५३, ३५४ अशी सहा मतदान केंद्र असून या मतदान केंद्रांमध्ये आमदार गोगावले यांना अनुक्रमे ३९१, २९६, ३७९, २९३, २५८, ३३५ अशी एकूण १९१२ मते मिळाली. याच मतदान केंद्रांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांना ५३१, ३२०, २७९, २१३, २४२, २९९ अशी एकूण १८७४ मते पडली. या शहरी भागातील मतदानाने केवळ ३४ मतांची आघाडी आमदार गोगावले यांना दिली असली तरी पोलादपूर नगरपंचायत क्षेत्राला कापडे बुद्रुक ग्रुप



ग्रामपंचायतीमधील रानबाजिरे व सडवली ग्रामपंचायतीतील चोळई ही महसूली गावे जोडल्याने शहराची मतदार संख्या वाढलेली दिसून आली.

महाड विधानसभा मतदारसंघातील पोलादपूर तालुक्यातील ३२७ माटवण हे पहिले मतदान केंद्र असून गोगावले यांना ४९३ व जगताप यांना ३५७ मतदान झाले. ३९३ पळचिल हे पोलादपूर तालुक्यातील शेवटचे मतदान केंद्र असून या ठिकाणी गोगावले यांना २७४ व जगताप यांना १३३ मतदान झाले. तालुक्यातील शहरी सहा आणि ग्रामीण ६१ अशा एकूण ६७ मतदान केंद्रामधून आमदार गोगावले यांना १८ हजार २३०, तर जगताप यांना १२ हजार ३८० मतदान झाले. यामध्ये आमदार गोगावलेंना तालुक्यात एकूण मताधिक्य पाच हजार ८५० इतके असल्याचे दिसून आले.

तालुक्यातील ६१ ग्रामीण मतदान केंद्र ही ग्रामपंचायतींच्या मतदारांसोबत निगडीत असून शिवसेनेने सर्वाधिक ग्रामपंचायती, सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य निवडून आणल्यामुळे हेच प्रभावी कार्यकर्ते अन्य मतदारांनाही आकर्षित करू शकले असल्याचे दिसून आले. याउलट जगताप यांनी ग्रामपंचायतीच्या पहिल्या टप्प्यामध्ये काँग्रेसतर्फे निवडणुका लढविल्या आणि त्यानंतरच्या दोन्ही टप्प्यांतील ग्रामपंचायती निवडणुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे लढविल्या, मात्र दोन्ही टप्प्यांमध्ये त्यांच्या समर्थकांना घवघवीत यश मिळण्याबाबत स्थानिक नेतृत्व पूर्णपणे उदासिन दिसून आले.

याखेरिज लोकसभा निवडणुकीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनेक कार्यकर्ते एकत्रितपणे महायुतीतील घटक पक्षांमध्ये प्रवेश करू पाहात असताना हे डॅमेज कंट्रोल जगताप यांना रोखता आले नाही. त्याचप्रमाणे आमदार गोगावले यांचे संघटन कौशल्य सरस ठरले असल्याचे दिसून आले.





रेवदंडा : विधानसभा निवडणुकीत अलिबाग मतदारसंघातून आमदार महेंद्र दळवी यांनी विजय मिळवल्यानंतर थोर निरूपणकार, पद्मश्री, महाराष्ट्र भूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी माजी जि.प.सदस्य मानसी दळवी, भाजपचे जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, सचिनदादा धर्माधिकारी, राहुलदादा धर्माधिकारी उपस्थित होते.

# सुंदरराव मोरे महाविद्यालयात शनिवारी रक्तदान शिबिर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ महाड संचलित येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये संस्थापक व माजी ग्रामविकास मंत्री कै. प्रभाकर मोरे यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि. ३०) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

महाड येथील जनकल्याण रक्तपेढीच्या विशेष सहकार्याने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन अध्ययन आणि विस्तार कार्य विभाग यांच्या विद्यमाने आयोजित केलेल्या या शिबिरामध्ये परिसरातील इच्छुक रक्तदात्यांनी सहभाग व नावनोंदणीसाठी इच्छूकांनी सहभागी व्हावे. यासाठी रासेयो अधिकारी प्रा. डॉ. राम बरकुले (९८८१८२३७६७), प्रा. डॉ. शैलेश जाधव (७२१८०५१३२१), आजीवन विभाग कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. नाथीराम राठोड (९२७२५८५८१५), प्रा. मनोज भगत (७५०७२८५०३९) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर व उपप्राचार्य प्रा. सुनील बलखंडे यांनी केले आहे.

# आदिती तटकरेंच्या विजयाची माणगावमध्ये जंगी मिरवणूक

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीकडून निवडणूक लढलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार आदिती तटकरे या दणदणीत मतांनी विजयी झाल्या. त्यानंतर माणगाव तालुक्यात माणगाव, मोर्बा, साई, इंदापूर अशा ठिकठिकाणी फटाक्यांच्या आतषबाजीत वाजतगाजत व नाचत कार्यकर्त्यांनी एकाच जल्लोष केला.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून होते. या मतदारसंघातून महायुतीच्या आदिती तटकरे किती मताधिक्याने विजयी होतात याची उत्सुकता मतदारसंघातील जनतेला होती. आदिती या निवडणुकीत तब्बल एक लाख १६ हजार ५० इतके मतदान मिळून विरोधकांपेक्षा ८२ हजार ७९८ इतके मताधिक्य अधिक मिळवून विजयी झाल्या. त्यानंतर श्रीवर्धन येथून पुढे म्हसळा, माणगाव, तळा, रोहा आदी पाच तालुक्यांत



विविध गावांतून जागोजागी कार्यकर्त्यांनी आदिती तटकरे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व आनंदोत्सव साजरा केला.

मोर्बा बसस्थानक येथे कार्यकर्त्यांनी आदिती तटकरे यांचे आगमन होताच जल्लोष केला. त्यानंतर पुढे माणगावात स्टेट बँक ऑफ इंडिया येथून आदिती यांची गाडीतून वाजतगाजत, नाचत महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोषात विजयी मिरवणूक काढली.

# आमदार महेंद्र दळवींच्या विजयाबद्दल मुरूड शहरात रॅली

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी हे सलग दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल मुरूड शहरात शिवसेनेतर्फे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महेंद्रशेठ आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देत मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

या वेळी शिवसेनेचे मुरूड शहर अध्यक्ष संदीप पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते मनोज भगत, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, अशोक धुमाळ, सुपारी खरेदी विक्री संघाचे चेरमन बाबा दांडेकर, माजी चेअरमन महेश भगत, गिरीश साळी, समीर दौनाक, अभी सुभेदार, अरविंद गायकर, बादल कबले, नम्माना खानजादे, शिवसेना जिल्हा संघटिका तृप्ती भोसले, दर्शन काळबेरे, माजी बांधकाम सभापती मेघाली पाटील, महेश पाटील, युवा नेते ओम पाटील आदींसह असंख्य कार्यकर्ते



मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी संदीप पाटील यांनी मुरूड शहरातून आमदार दळवी यांना मताधिक्य दिल्याबद्दल मतदारांचे विशेष आभार मानले. मनोज भगत यांनी सर्व मित्र पक्षांनी एकत्रित येऊन खूप मेहनत घेऊन आमदार दळवी यांना १२ हजारपेक्षा जास्त लीड मिळवून दिल्याबद्दल समस्त मतदारांचे आभार व्यक्त केले. ओम पाटील म्हणाले की, मुरूड तालुका व शहरी भागातून आमदार महेंद्र दळवी यांना मोठा लीड देऊन केलेल्या विकासकामांची मतदारांनी परतफेड केली आहे. मुरूड तालुक्यातून सर्वच स्तरातून आमदार दळवी यांना उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला असून मतदारांनी आमदार दळवी यांना स्पष्ट कौल दिला आहे.

विजयी रॅली मुरूड शहरातून विविध भागातून फिरवण्यात आली. ढोल ताशाच्या गजरात व फटाक्याच्या आतषबाजीने संपूर्ण मुरूड शहर गजबजून गेले होते.

# वरसोलीच्या विठ्ठलाची आजपासून यात्रा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील विठोबाची यात्रा मंगळवार (दि. २६) पासून सुरू होत आहे. या यात्रेत ४५०हून अधिक लहान-मोठी दुकाने थाटण्यात आली आहेत. यंदा ही जत्रा सहा दिवस चालणार आहे.

वरसोली गावात राघोजी आंग्रे यांनी विठोबाचे मंदिर बांधले. १७७८मध्ये नर्मदाबाई आंग्रे यांनी विठोबा, रखुमाई, गरुड या तीन मूर्तींची स्थापना केली तसेच त्यांनी आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशी असे दोन उत्सव सुरू केले. १८४०मध्ये उत्सवापूर्वी मंदिराला रंगरंगोटी करीत असताना शिखर कोसळले व त्याखाली रंगारी चेंगरून मरण पावला. या दुर्घटनेचे दुःख जनतेने विसरावे यासाठी आंग्रेंनी विठ्ठल मंदिराच्या पटांगणात जत्रा सुरू केली.



तत्कालीन परिस्थितीत आंग्रेंनी सुरू केलेली जत्रा आजतागायत विनाखंड पाच दिवस भरते. मंगळवारपासून सुरू होणाऱ्या या जत्रेनिमित्ताने मंदिरात विविध कार्यक्रम आयोजिण्यात आले आहेत.

पूर्वी वरसोलीची यात्रा फक्त देवस्थानच्या व ग्रामपंचायतीत क्षेत्रात भरायची. आता परिसरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. यात्रेचे स्वरूपही बदलले असून व्यावसायिकांचीही संख्याही वाढल्याने आधीची जागा कमी पडू लागली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत हद्द सोडून व्यावसायिक अलिबाग-वरसोली रस्त्यालगत रामनाथ कुंभारआळीत दुकाने थाटू लागले आहेत. अलिबाग नगर परिषद, वरसोली व चेंढरे ग्रामपंचायत क्षेत्रात यात्रा भरते.

**पहिल्या दिवशी मंगळवारी पहाटे अडीच वाजता काकड आरतीने वरसोली यात्रेला सुरुवात होईल. यात्रेनिमित्त मंदिरात विविध कार्यक्रम आयोजित केले असून भाविकांची गैरसोय होणार नाही, याची खबरदारी घेतली जात आहे.**
**-रमेश नाईक, प्रमुख विश्वस्त, श्री विठोबा देवस्थान, वरसोली**

# ५००व्या शिबिरात रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांचा सत्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद, बजरंग दल कर्जत प्रखंड व राजाभाऊ कोठारी यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे कोठारी यांचे ५००वे रक्तदान शिबिर होते. या वेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री शनि महाराज देवस्थानच्या रविकिरण सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १०४ जणांनी रक्तदान केले. राजाभाऊ यांचे पहिले रक्तदान शिबिरही विश्व हिंदू परिषदे मार्फत आयोजित केले होते. या त्यांच्या




उपलब्धीबद्दल त्यांचा मुख्य अभियंता जितेंद्र अगरवाल यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

या शिबिरास विभाग सहमंत्री प्रसन्न खेडकर, कुलाबा जिल्हा मंत्री साईनाथ श्रीखंडे, जिल्हा बजरंग दल संयोजक विशाल जोशी, जिल्हा मातृ संयोजिका मीनाक्षी अगरवाल, प्रखंड अध्यक्ष सुभेदार विनायक उपाध्ये, उपाध्यक्ष उमा डोंगरे, प्रखंड मंत्री अनंता हजारे, संयोजक कमलाकर किरडे, प्रतीक पाटील, सचिन ठाकूर, केदार भडगावकर, हर्षल पारखी, विशाल पाबळे, वैभव जोशी उपस्थित होते.

